संस्थापकः राजन राजे
KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर
RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 5 | Marathi Monthly | Thane, 1 November 2024 to 30 November - 2024 | Pages 16 | Price : 10/-

# भाजपचे महाराष्ट्रद्रोही षडयंत्र...

**देवेंद्र फडणवीस यांच्या झालेल्या भाषणाला भुलून जर तुम्ही त्यांना महाराष्ट्राची आणि महाराष्ट्राच्या जनतेची काळजी आहे, असं तुम्हाला वाटू लागलं असेल; तर, जरा थांबा.**



१) कोरोना आला तेव्हा संपूर्ण राज्यातल्या विरोधीपक्षांनीदेखील एकत्र येऊन, आमदारनिधी CM फंडात टाकून राज्यातील जनतेचा विचार केला होता.

२) त्याच्या बरोबर उलट, आमच्या अनाजी पंताने, त्यांच्या १०५ भाजप आमदारांचा निधी, महाराष्ट्र राज्याला न देता, केंद्रात Pm Care ह्या खाजगी फंडात दिला, जेव्हा महाराष्ट्रातील जनतेला त्याची सक्त गरज होती.

...पृष्ठ क्र. २ वर

# अदानींसाठी कायदे आणि महाराष्ट्रहितही पायदळी!

इंडोनेशियातून आयात केलेल्या कोळशाच्या किमतींमध्ये कृत्रिम वाढ करून, अदानींच्या कंपन्यांनी आधीच महाराष्ट्राच्या वीजग्राहकांची सुमारे २२०० कोटी रुपयांची लूट केली आहे. आता त्यांना सौरवीज ५,००० मेगॅवॅट्स आणि १,६०० मेगॅवॅट्सचा औष्णिक (कोळसा) वीज प्रकल्प मंजूर झाला आहे. यातून आणखी किती लूट होईल?

...पृष्ठ क्र. ५ वर

# रतन टाटा आभाळाएवढे मोठे! पण, तरीही...

'सामाजिक-योगदान' देण्यात अपयशी ठरल्याचा 'भांडवली-व्यवस्थे'वर ठपका ठेवणाऱ्या...महान उद्योगपती 'रतन टाटा' यांना श्रद्धांजली वाहत असतानाच; त्यांच्या 'परिनिर्वाणा'ला जोडून आलेल्या आजच्या 'जागतिक मानसिक-आरोग्य दिनी' (World Mental-Health Day) तरी, 'भांडवली-व्यवस्था' स्वतःचं 'आत्मपरीक्षण' (Self-Reflection) करणार आहे किंवा नाही...???

...पृष्ठ क्र. ३ वर



## अंतरंग




याने कुछ तो बडा होने वाला है ! वाट पाहू या !

...विजय घोरपडे.

पृष्ठ क्र. ७




"बैल गेला आणि झोपा केला...."

...राजन राजे

पृष्ठ क्र. ८

"सॅमसंगसारख्या भारतातील सरसकट सगळ्याच मल्टीनॅशनल कंपन्यांची मस्ती एकदाची उतरवाच....."

...राजन राजे

पृष्ठ क्र. ९

# मा. राजन राजेंच्या उपस्थितीत, 'वाल्मेट इंडिया'च्या कामगार सदस्यांचे दिमाखदार स्नेहसंमेलन संपन्न !



'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची युनियन असलेल्या वाल्मेट इंडिया प्रा. लि. (फ्लो कंट्रोल युनिट) या आस्थापनेच्या, डोंबिवली एमआयडीसी आणि अंबरनाथ एमआयडीसी या दोन्ही युनिटमधील, कामगार सदस्यांच्या पगारवाढीच्या त्रैवार्षिक कराराच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त, डोंबिवली (पू.) येथील ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल येथे येथे, वाल्मेट युनियन युनिटच्या वतीने रविवार, दि. ६ ऑक्टोबर-२०२४ रोजी, एका स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे संस्थापक/अध्यक्ष मा. राजन राजे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वाल्मेट इंडिया प्रा. लि. (फ्लो कंट्रोल युनिट) या आस्थापनेतील कामगारांनी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सदस्यत्व स्वीकारल्यानंतर, वर्षभरातच मा. राजन राजे यांच्या सक्षम व प्रखर नेतृत्त्वाखाली, पगारवाढीचा पहिलावहिला त्रैवार्षिक करार यशस्वीपणे संपन्न झाला होता. याच कराराच्या वर्षपूर्तीनिमित्त, या दिमाखदार स्नेहसंमेलनाचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी कामगार सदस्यांच्या वतीने मा. राजन राजे यांना शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देतानाच, शिवछत्रपती महाराजांचे स्मृतिचिन्ह प्रदान करुन, त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, सचिव श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. स्नेहसंमेलनाचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, श्री. कमलेश कोल्हे, श्री. अविनाश बढे, श्री. लोटन येलवे, श्री. संदीप पवार, श्री. मिलिंद जोशी, श्री. निलेश जगताप, श्री. सुभाष देशमुख, श्री. लक्ष्मण शिंदे या युनिट कार्यकारिणी सभासदांसह, 'वाल्मेट'च्या डोंबिवली आणि अंबरनाथ आस्थापनेतील कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.



## भाजपचे महाराष्ट्रद्रोही षडयंत्र...

...पृष्ठ क्र. १ वरुन

३) अगदी सुरुवातीपसूनच ही टोळी महाराष्ट्रातील जनतेला वेठीस धरून गलिच्छ राजकारण खेळण्यात मग्न होती. केंद्राने लॉकडाऊन जाहीर करण्याआगोदर, महाराष्ट्र राज्याने तो जाहीर केला होता. हे आपण विसरून चालणार नाही. त्या वेळी सरकारचे उत्पन्न घटेल सरकार चालवणे कठीण होईल हे सगळे मुद्दे बाजूला ठेवून महाराष्ट्राने राज्यातील जनतेचे हित लक्षात घेत हे केलं.

४) परीक्षांचे राजकारण: पोरं जगोत की मरोत, त्यांनी परीक्षा दिल्याचं पाहिजेत, अशी भूमिका फडणवीस मांडत होते. गोवा आणि इतर भाजपशासित राज्यांत आरएसएस आणि संघप्रणित ABVP परीक्षा रद्द करा म्हणून, त्या त्या राज्यांच्या राज्यपालांच्या कडे निवेदन देत होती. पण, तेच महाराष्ट्रात परीक्षा घेतल्याचं पाहिजेत म्हणून बोंब मारत होते. परीक्षा घ्यायला लावून महाराष्ट्रात कोरोना अधिक वाढवला पाहिजे हा ह्यांचा हेतू होता.

५) हळूहळू सगळं काही आटोक्यात येत आहे, असं दिसताच; तडफडणविसाच्या पोटात दुखायला लागलं आणि मग पुण्यातून व्यापारी संघ (आरएसएस) ने दुकानं उघडा, Odd Even जाचक आहे. अशा आरोळ्या मारायला सुरुवात केली. सरकारने ही मागणी मान्य केली. आता आणखी लोकांना संक्रमित कसे करता येईल, यासाठी तडफडणविस देऊळे उघडी करा म्हणत, लोकांना घराबाहेर घेऊन आले.

६) हे सगळं होत असताना, यांचे लाखोंच्या वर असलेले संघ आणि आरएसएसचे कार्यकर्ते कोरोंना एक अफवा आहे. प्रत्येक पेशंट मागे केंद्राकडून दोन लाख रुपये राज्याला मिळतात, म्हणून फेक केसेस दाखवत आहेत, अशा नानाविविध अफवा पसरवण्यात आल्या. ज्या मुळे लोकांनी मास्क वापरणे बंद केले, सोशल डिस्टन्स ठेवणे बंद केले आणि त्यामुळे आटोक्यात असलेला करोना पुन्हा हाताबाहेर गेला.

७) भाजपचा डाव साधला होता. आता केंद्राने राज्यांना GST चा परतावा बंद केला, PPE किट, व्हेंटिलेटर, मास्क, इत्यादी अत्यावश्यक सामग्री महाराष्ट्राला देणार नाहीत, हे धोरण स्वीकारले. महाराष्ट्राकडे आवक नसताना, जनतेला पुरेशा सोयी देणार कुठून हे माहीत असताना, तडफडणविसाने हे सरकार आजार रोखण्यात अपयाशी ठरले आहे, अशा आरोळ्या ठोकायला सुरुवात केली. एकीकडे जनतेला धोक्यात टाकायचं, दुसरीकडे केंद्राने मदत थांबवायची, तिसरीकडे मदत महाराष्ट्राला न करता, Pm Care ला करायची आणि मग मलाच महाराष्ट्राची चिंता आहे असं भासवणारे तडफडवणीस म्हणजे झरितले शुक्राचार्य आहेत.

८) पाठोपाठ सुशांत सिंग प्रकरणात, कंगनासारख्या दळभद्री आरएसएस आणि भाजपप्रणित नटीकडून आणि अर्णवसारख्या भामट्याकडून सरकारवर टीका करत राहायचं, चिथवण्या द्यायच्या, सूनले उद्धव ठाकरे, क्या उखाड लोगे?? कंगना पण हेच करत आहे सद्या. मी नऊ तारखेला महाराष्ट्रात येणार कोण काय करते ते बघते, म्हणत आमच्या मुंबईला पाकिस्तान म्हणायचं आणि ह्यांना काही केलं की; मग, लोकशाही धोक्यात आहे, संविधान धोक्यात आहे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आहे म्हणत, आपणच बाबासाहेबांचे संविधान लिहिलं असा बनाव आणायचा. महाराष्ट्रातील जनतेने ह्यांचं खर रूप आज जर ओळखलं नाही; तर, महाराष्ट्राला विकून खातील हे भामटे. म्हणून सांगतो तडफडनविस टोळी म्हणजे, महाराष्ट्रद्रोही गुजराथी भैये आहेत, त्यांना घरीच बसवलं पाहिजे.

# रतन टाटा आभाळाएवढे मोठे! पण, तरीही...

...पृष्ठ क्र. १ वरुन

**कधि कुठल्या उद्योगपतीला भेटावसं चुकूनही वाटत नसताना...अनेकदा असं वाटून गेलं की, आपण 'रतन टाटां'सारख्या, उद्यमशीलतेच्या नफ्यातोट्याच्या मर्यादित परिघापलिकडे, उत्तुंग आसमंतात झेपावू पहाणाऱ्या व्यक्तित्वाला, काही मोजके क्षण तरी एकटं भेटून बोलावं...विशेषतः, कंपनी–दहशतवाद (Corporate-Terrorism) व पर्यावरणीय–महासंकटांच्या पार्श्वभूमीवर त्यांचं मत जाणून घ्यावं म्हणूनच...पण, भांडवली–व्यवस्थेनं 'हितशत्रू' मानलेल्या आणि प्रस्थापित राजकीय–व्यवस्थेनं 'RDX'सारखा विस्फोटक म्हणून 'अस्पृश्य' मानलेल्या माझ्यासारख्या, तशा नगण्य व्यक्तिला, ती भेट मिळणं दुरापास्तच नव्हे; तर, अशक्यप्राय होतं आणि घडलंही तसंच! त्यांच्या अखेरच्या काळात, ज्यांनी मराठी–माणसांची प्रचंड फसगत केली, अशा राजकीय नेत्यांच्या भेटीगाठीसाठी रतन टाटा, आवर्जून जात असतानाची वृत्त ऐकताना–पहाताना, कुठेतरी अंतरी वैषम्याची एक कळ उमटून जायची; पण, त्याला काही इलाज नव्हता...'टाटासमूह' देखील काळाच्या ओघात बराच बदलून गेल्याची, ती 'निशाणी' होती ('नीरा राडिया' प्रकरणाच्या गढूळ गंगेतून बरंच पाणी वाहून गेल्यानंतरची)!**

आज राहून राहून वाटतं की, त्यांनीच उच्चारलेल्या 'Societal Benefits'ची कक्षा लंघून जाणारं असं काही, मानवी–समाजाला अधिकच 'क्रांतिकारी–योगदान', त्यांना नक्कीच देता आलं असतं...कारण, त्यांच्या 'टाटा', या नावातच फार मोठी ताकद होती! काळ कुठलाही असो; तो काळपुरुष, ती नियती...प्रत्येक कालखंडात, काही व्यक्तिंच्या व्यक्तिमत्त्वात, एक अजब रसायन एवढं ठासून भरते की, अशा मोजक्या व्यक्ति, इतिहासाला अगदी काळाच्या प्रवाहाविरुद्ध जाणारं; पण, अंतिमतः समाजहितैषी असणारं मूलगामी स्वरुपाचं चांगलं वळण देऊ शकण्याची क्षमता बाळगून असतात...रतन टाटा, त्यापैकीच एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व! पण, असं असूनसुद्धा, तसं काही होणं, बहुधा नियतीला मंजूर नसावं....

**''सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा, कुठं हाय हो...सांगा धनाचा साठा न् आमचा वाटा कुठं हाय हो'', हे वामनदादा कर्डक यांचं गीत ऐकतच, आपण पूर्वी बिर्लांच्या तुलनेत टाटांना अजमावत आलो आणि आता अंबानी–अदानीसारख्या ''नेसूचं सोडून डोईला बांधणाऱ्या'' विधिनिषेधशून्य व उद्योग–यशासाठी, पैशासाठी, भांडवली–सत्तेसाठी कुठल्याही थराला जाणाऱ्या उद्योगपतींच्या तुलनेत पहातोय... तेव्हा, ते खचितच आभाळाएवढे मोठे वाटणं स्वाभाविकच!**

१९९०–९१च्या "ImCOm' धोरण संक्रमण–काळात, आपल्या मुलांसाठी नोकऱ्या मागणाऱ्या एका बड्या टाटा–कंपनीच्या युनियन–कमिटीला, ''मला तुमच्या नोकऱ्यांची सध्या फिकीर आहे'', असं करड्या शब्दात बजावून त्यांची बोळवण करणारे रतन टाटा आणि सध्याच्या अवघड स्थितीत (जी कामगार–कर्मचारीवर्गासाठी कायमच मौजूद असते...जसे **"Profits are Private & Losses are Public**; अगदी तसेच, 'सुगीचे दिवस' कायमच भांडवलदारवर्गासाठी आणि 'ओढगस्ती'चे दिवस कामगार–कर्मचारीवर्गासाठीच खास 'आरक्षित' असतात) ''राष्ट्र उन्नती व उभारणीसाठी आठवड्याचे ७० तास काम करा'', असं ठणकून सांगणारे आजचे (वा)नरायणमूर्ती...यांच्यात भेद करताना स्वतंत्र बुद्धिच्या व सारासार विवेक बाळगून असणाऱ्या, कुणालाही स्वभावतः कष्ट पडावेत!

...कुठल्या देशाच्या विकासाविषयी बोलत असतो आपण? देश, दगडधोंड्यांचा–काँक्रिटच्या बांधकामांचा असतो काय? तो असतो, जिवंत हाडामांसाच्या माणसांचा... आशाआकांक्षा, ज्यांच्या धमन्यांतून निरंतर धावत असतात, अशा भावभावना–संवेदनांच्या चेतासंस्थांनी परिपूर्ण माणसांनी भरलेला प्रदेश, म्हणजे असतो देश!



...ज्यापद्धतीने, रासवटवृत्तीच्या (खरंतर, पांढरपेशे गुंडच) HR/IRवाल्यांकडून 'भांडवलदार–परममित्र' असलेल्या राजकारण्यांना हाताशी धरुन, अनेक टाटा कंपन्यांमधल्या युनियन्सचं साफ खच्चीकरण केलं गेलं...त्या कामगारांचे भोग, ज्याचे त्यालाच माहित! युनियन्स वगैरे काही फार आदर्शवत असतात...असं बिलकूल दावा असण्याचं कारण नाहीच. पण, ''चीनची भिंत तडकली तर लिंपली जाते...तोडली जात नाही'', हे सूत्र ध्यानात असू द्या!

**...सद्यस्थितीत, सगळ्याच छोट्यामोठ्या कंपन्या–कारखान्यांमधून युनियन्स जबरदस्तीने जवळपास संपुष्टात आणल्या गेल्यानं वा संबंधित HR/IR अधिकारीवर्गाकडून कटकारस्थानं रचून; तसेच, कामगार खात्याला हाताशी धरुन, पोलिसांची सरकारी दमनयंत्रणा वापरुन व बिगर–सरकारी दमनयंत्रणासदृश व्यवस्था वापरुन (स्थानिक राजकारणी–गुंडांना आपल्याच जमातीचा 'घाम–रक्त' स्वस्तात विकायला लावून बक्कळ पैसा कमावणारे 'कंत्राटदार' बनवून, खाजगी बाऊन्सर्स वगैरे माजलेल्या भाडोत्री गुंडापुंडांची दहशत, रेड–फ्लॅगिंग, मोठ्या रकमेचे पर्सनल–बॉण्डस व जागोजागीची CCTVची करडी नजर...हीच ती व्यवस्था) पूर्णतया नामोहरम करण्यात आल्यानंतरची भयावह व संतापजनक परिस्थिती पाहिल्यानंतर... बळकट पण, विचारी–नीतिमान असलेल्या जातिवंत 'युनियन्स'च्या आवश्यकतेची तीव्रता भासल्यावाचून रहात नाही!**

आजच्या घटकेला औषधाला देखील 'लोकशाही', कुठल्या आयटी–उद्योगात किंवा भारतातल्या इतर उद्योग–सेवाक्षेत्रात शिल्लक आहे काय, जिथे कामगार–कर्मचाऱ्यांच्या आयुष्यातला सर्वात मोठा व महत्त्वपूर्ण काळ व्यतीत होतो? लैंगिक–शोषणापासून अनेकविध गैरप्रकार, आय–टी उद्योगापासून इतर उद्योग–सेवाक्षेत्रात मोठ्याप्रमाणात सुरु आहेत; पण, तरीही 'कॉर्पोरेटीय–शांति'चा सन्नाटा पसरलेला आहे तिथे...ही कुठल्याही प्रार्थनास्थळीची पवित्र–शांतता नव्हे; ती आहे, स्मशानातल्या मुडद्याफरासांची अपवित्र–निर्जीव शांतता!

...तेव्हा, कामगारांच्या 'सन्मानाने जगण्या'च्या आसाला भिडलेला आधारच नाहीसा करत, त्यांचं उध्वस्तीकरण कसं झालंय...ते आपली स्वार्थी–मतलबी झापडं बाजुला ठेऊन व अंतरी थोडी संवेदनशीलता जागवून...रतन टाटांना निव्वळ उपचार म्हणून श्रद्धांजली वाहणाऱ्या भांडवली–व्यवस्थेत पुरत्या मुरलेल्या कुणी पहावंच! भांडवलदारांची श्रद्धांजली 'उपचार' का म्हणायची; तर, भांडवलदार, हे कुणाच्याच बापाचे नसतात...नसतो त्यांना कुठला 'देश–प्रदेश', असतो नजरेसमोर सदैव फक्त नफ्याचा 'धनादेश'!

एक विचार राहून राहून मनात येतो की, 'कंत्राटी–पद्धती'ने सरसकट तुटपुंज्या पगारावर 'कंपनी–दहशतवादा'खाली (Corporate-Terrorism) गुलामगिरीत कामगार/कर्मचारी 'नवअस्पृश्य' म्हणून राबत असताना, तीन काळ्या कामगार–कायद्यांची 'काळी कामगार–संहिता' कामगारविश्वाच्या आसमंतात घोंघावत असताना, अनेक IT कंपन्यांमधल्या तरुणपिढीला या कंत्राटी–पद्धतीतल्या गुलामगिरीसोबतच कंपनी–व्यवस्थापकीयवर्ग 'ताणतणाव हलका' करण्याच्या (Stress Busters) मिषाने दारु, सिगरेट व इतर अंमली–पदार्थांच्या नादी लावत असताना व त्यांना 'प्रोजेक्ट–कमिटमेंट'च्या नावाखाली मरमर राबवून घेतलं जात असताना किंवा भांडवली–व्यवस्थेतूनच केवळ उद्भवलेली आणि मानजातीसह अवघ्या सजीवसृष्टीचा संहार करण्याची प्रलयंकारी क्षमता बाळगून असलेली 'पर्यावरणीय–महासंकटे' धुमाकूळ घालत असताना... जे. आर. डी. टाटांचाही दृष्टीकोन, रतन टाटांसारखाच यासंदर्भात, काहीसा 'निष्क्रिय' (Passive) राहिला असता का?

**१० ऑक्टोबर या 'जागतिक मानसिक–आरोग्य दिनी'** (World Mental-Health Day), **अशासारखा प्रश्न तेव्हा अधिकच संयुक्तिक बनतो; जेव्हा, भारतात मानसिक–आजारांचा प्रकोप 'कोविड–साथी'पेक्षाही जास्त पसरुन 'उडता पंजाब'सारख्या घटना सर्वत्र घडत असतात, बंगळुरु–चेन्नईसारख्या हायटेक–सिटीमधला अत्युच्चशिक्षित तरुणवर्ग निव्वळ कामाच्या दबावापोटी आत्महत्याग्रस्त होतो (आणि, या घटना तुरळक वा मर्यादित नसून, त्या मोठ्याप्रमाणावर** ...पृष्ठ क्र. ४ वर

...पृष्ठ क्र. ३ वरुन
**‘प्रातिनिधिक–स्वरुपा’च्या असतात) किंवा ‘लॅन्सेट सायकियाट्री कमिशन’सारख्या संस्था २० कोटीहून अधिकचा तरुणवर्ग आयुष्यातली अस्थिरता व वैफल्यामुळे अंमली–पदार्थांच्या आहारी गेल्याची सप्रमाण धक्कादायक मांडणी करत असतात!**

टाटा–समूहाने असंख्य फार मोठी सामाजिक कामं केलीत आणि जी केलीत, ती फक्त कुठल्या विशिष्ट जमातीसाठी नव्हे (मध्यंतरी, मी गुजराथी आहे आणि गुजराथचंच भलं पहाणार, असा ‘फुत्कार’ मुकेश अंबानींनी टाकल्याचं कानावर आलं होतं) तर, सर्वसामान्यांसाठी केलीत... हे अगदी निर्विवादच! उदाहरणार्थ TISS, TIFR सारख्या संस्था; तसेच, कर्करोगावर उपचार व संशोधन करणारी कर्करोग (कॅन्सर) इस्पितळे ही टाटांचीच देणगी (मात्र, ज्या भांडवली–व्यवस्थेच्या पैशातून ही इस्पितळे उभारली गेली; त्या भांडवली–व्यवस्थेचंच, कर्करोगासारखे भयंकर रोग, हे देणं आहे...हे विसरुन चालणार नाही)... त्यांनी बिर्लांसारखी देवळे, मंदिरे वगैरे जीवनावश्यक नसलेल्या बाबींवर व्यर्थ खर्च न करता (सध्या पुतळे आणि ऐश्वर्यसंपन्न प्रार्थनास्थळं बांधण्यावर हजारो कोटी उडवण्याचा वेडाचार व बेजबाबदार स्वार्थी राजकीय–विचार, देशात गेले दशकभर सुरु आहे), हे सामाजिक–योगदान दिलं, ही असाधारण बाबच!

**...सरतेशेवटी, या औद्योगिक–क्रांतिच्या उण्यापुऱ्या तीन शतकांनीच दाखवून दिलंय की, ‘भांडवलशाही’ ही टाटांसारखी बऱ्यापैकी ‘उदारमतवादी’ असो वा अंबानी–अदानी–बिर्लांसारखी ‘आपमतलबी’ असो...ती येतेच ती, कार्बन–उत्सर्जन व अन्य प्रदुषणांच्या रुपानं (रासायनिक, आण्विक, विद्युत–चुंबकीय वगैरे) निसर्ग–पर्यावरणाच्या मुळावरच! पृथ्वी, ही काही उद्योग–उभारणीसाठी किंवा नोकरी देण्यासाठी नव्हेच, हे आता या भांडवली–विचारातून झालेल्या ‘अक्षम्य’ अशा मानवी–हस्तक्षेपाने खवळलेली नियतीच दाखवून देतेय...फक्त, पहाणाऱ्यांचे डोळे उघडे पाहिजेत!**

**त्यामुळेच, उद्योग–उभारणी वगैरे करणारे, मोजक्या काही दशकं–शतकांसाठी व मोजक्या काही पिढ्यांसाठी...नोकऱ्या–धंदे–व्यवसायातून औटघटकेची ऐषोआरामी जिंदगी देऊन जाणारे ‘नायक’ ठरतील... पण, प्रलयंकारी भविष्याचं ताट, पुढील पिढ्यापिढ्यांसाठी आरक्षित करण्याच्या महापातकाचेही तेच ‘धनी’ बनतील.**

निसर्ग–पर्यावरणासंबंधीची रतन टाटांची कमी पडलेली जागरुकता म्हणा वा काहीशी अनास्था म्हणा (केवळ, ‘वृक्षलागवड–वनीकरण’ केलं की, निसर्ग–पर्यावरणाप्रति असलेली आपली ‘‘इतिकर्तव्यता’ संपली, असं मानणं...हीच अज्ञानमूलकता व ‘किंकर्तव्यमूढता’ होय)...पण, त्यामुळे, त्यांना अवघ्या सजीवसृष्टीच्या हितासाठी ‘भांडवली–व्यवस्थे’विरुद्ध बंडाचं निशाण फडकवण्याची पायी चालत आलेली संधि साधता आली नाही, हे अवघ्या सजीवसृष्टीच्या दृष्टीने चिंताजनकच! बरं, ते तसे कौटुंबिक पाशातही अडकले नसल्यानेच, त्यांना अशी काही काळाला मोठं वळण देणारी व प्रचलित व्यवस्थेला आव्हान देणारी भूमिका घेता येणं, तुलनेनं अधिक सोपं व सहजसाध्य होतं...पण, ते होणं नव्हतं!


**...लक्षात घ्या की, औद्योगिक–क्रांति झालीच नसती; तर, मनुष्यजात तशीच पुढे हजारो–लाखो–करोडो पिढ्या जगली असती (मोठा उल्कापात होण्यासारखा वा मोठा अशनी कोसळण्यासारखा अस्मानी–संकटांचा धोका वगळता)...पूर्वीसारखी तशीच, ‘मानवी व पशू ऊर्जे’वर, शारिरीक काबाडकष्ट सोसत जगली असती (पृथ्वी, ही फक्त, जीवन जगवण्यासाठी–फुलवण्यासाठी आहे... नोकरी–धंदा–उद्योगासाठी नाहीच नाही); पण, विनाशाला स्वतःच्याच कर्माने ‘आवतण’ देणारी, पर्यावरणीय–महासंकटांना आपल्याच ‘पादुका’ बहाल करणारी, अवसानघातकी जमात खचितच बनली नसती!**

आता, केवळ उद्योगपतीच्या–उद्योजकांच्या अंतःस्फुर्तिवर अवलंबून रहाण्याचे दिवस संपलेत... तंत्रज्ञान, आपल्याला मागे टाकून एवढं पुढे निघून गेलंय की, आता उद्योगसमूहाची दिशा ठरवणं, तुलनेनं खूपच सोपं झालंय. तेव्हा, खाजगी–क्षेत्रातील उद्योगांची मालकी काढून घेऊन सार्वजनिक करणं (Nationalisation of Industries), ही काळाची फार मोठी व तातडीची गरज आहे... पण, उद्योगपतींचे देव्हारे असेच माजवले जात राहिले (जी भांडवली–व्यवस्थेची गरज आहे)... तर, हे आजचं अवघड असलेलं काम, नजिकच्या भविष्यात अशक्यप्राय बनेल व मनुष्यजात, या पृथ्वीतलावरुन पुढील काही दशकातच नष्टप्राय होईल! सरकारने ताब्यात घेतले गेलेले खाजगी–उद्योग, उत्तम जाणकारांकडून (नुसतेच, पाट्या टाकणारे अहंमन्य पुस्तक–पंडीत IAS अधिकारी नकोत) योग्यतेनुसार व योग्य प्रमाणात स्वातंत्र्य बहाल करुन, चालवले गेले पाहिजेत... ज्यामधून, माणूस आणि निसर्ग यांच्या शोषणावर मोठे निर्बंध घालता येतील (‘आरोग्य व संरक्षण’, ही दोन क्षेत्रे वगळता बाकी ठिकाणी निसर्ग–पर्यावरणावरील आघातांचाच प्राधान्याने विचार करुन) व त्यातून, मनुष्यजातीचं पुढील भवितव्य सुरक्षित राखता येईल, हा आज रतन टाटांना श्रद्धांजली वाहताना विचार बळकट व्हायला हवा... धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग–पर्यावरणस्नेही ‘हरित–पक्ष’...The First ‘Green-Political Party' Of India)

# अमलीपदार्थांचा व्यवसाय आणि वाढत्या व्यसनाधीनतेसंदर्भात, त्रिस्तरीय चौकशी समिती नेमण्याची ‘धर्मराज्य पक्षा’ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : गेल्या काही महिन्यांपासून, भारतात अमलीपदार्थांचा वापर मोठ्याप्रमाणात होताना दिसत आहे. देशभर पसरणारा व्यसनांच्या अजगराचा हा विळखा, तातडीने सोडविला गेला नाही तर, संपूर्ण तरुणपिढी आणि या देशाचं भवितव्य हा अजगर गिळंकृत करेल आणि व्यसनाधीन झालेल्या बेरोजगार तरुणांना गुलाम व गुन्हेगार बनण्यास किंवा बनविण्यास फार काळ लागणार नाही. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराची आणि उर्वरित महाराष्ट्राची परिस्थिती काही वेगळी नाही, किंबहुना अत्यंत चिंताजनक स्थिती या पुरोगामी राज्याची झालेली आहे. गेल्या आठवड्यात पुण्यात अमलीपदार्थाचे सेवन करुन, एका तरुणीवर अत्याचाराची घटना घडल्याने, अमलीपदार्थाचा मुद्दा ‘उडता पंजाब’च्या धर्तीवर, पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला असून, मुंबई–पुणे, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांतच नव्हे; तर, महाराष्ट्रातील छोटी शहरे व ग्रामीण भागांतदेखील अमलीपदार्थाच्या व्यवसायाने आपले जाळे भक्कमपणे विणायला सुरुवात केलेली आहे.**



अमलीपदार्थ सेवनाच्या माध्यमातून, मुंबई–महाराष्ट्रासह, संपूर्ण देशभरात गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ झाल्याच्या घटना सर्रास पाहायला मिळत आहेत. परिणामी, अमलीपदार्थांच्या व्यसनांचे प्रमाण, दिवसेंदिवस अधिकच उग्ररुप धारण करताना दिसत आहे. याचा प्रतिकूल परिणाम, आगामी विधानसभा निवडणुकीवर होण्याची दाट शक्यता असल्याने, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने, महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कालिंगम यांना पत्र पाठवून, याप्रकरणी त्रिस्तरीय चौकशी समिती नेमण्याची करण्यात आली आहे.

दरम्यान, उपलब्ध गुन्ह्यांच्या (एफआरआय) आकडेवाडीनुसार, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्र ही राज्ये अमलीपदार्थाच्या सेवनात आघाडीवर आहेत. चिंताजनक बाब म्हणजे, मुंबई शहर हे, अमलीपदार्थाच्या सेवनात पहिल्या क्रमांकावर आहे. ही बाब प्रगत आणि पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रासाठी प्रचंड लाजिरवाणी आहे. राज्यातील तरुणपिढी अमलीपदार्थाच्या विळख्यात पुरती गुरफटून गेल्याचेच यातून अधोरेखित होत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हे प्रकरण अतिशय गंभीर आणि संवेदनशील बनलेले आहे. कारण, अमलीपदार्थाच्या पूर्णपणे आहारी गेलेल्या तरुणांना, काही गुन्हेगारी प्रवृत्तीची राजकीय मंडळी, आपल्या चुकीच्या कृत्यांसाठी या तरुणपिढीचा वापर करुन घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा मतदानावर विपरीत परिणाम होऊ शकतो. एकीकडे ऐन दिवाळीच्या तोंडावर, आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी, अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपस्थित नसल्यामुळे, अन्नप्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांची तपासणी थंडावली आहे; तर, दुसरीकडे मात्र, अमलीपदार्थविरोधी पथकाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असतानाही, अवघ्या महाराष्ट्रभरात, अमलीपदार्थांचा बेसुमार वापर वाढीस लागून, व्यसनाधीनता मोठ्याप्रमाणात वाढलेली आहे. याच पार्श्वभूमीवर, या संपूर्ण देशविघातक कृत्यांची चौकशी करण्यासाठी, एक त्रिस्तरीय समिती नेमण्यात येऊन, अमलीपदार्थ विक्री आणि त्याचा व्यवसाय अथवा वितरण करणाऱ्या समाजकंटकांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी कठोर पाऊले उचलावीत, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आपल्या पत्रातून राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.

# अन्न पदार्थांमधील भेसळप्रकरणी, अन्न आणि औषध प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांची, आगामी विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्ती न करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कोकण विभागाने अन्न पदार्थांबरोबरच, पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांच्या केलेल्या चाचणीमध्ये पाण्याचा एक नमुना असुरक्षित; तर, अन्नाचे काही नमुने कमी दर्जाचे असल्याची गंभीर घटना, प्रसिद्धीमाध्यमांद्वारे उघड झाली आहे. यासंदर्भातील धक्कादायक बाब म्हणजे, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कोकण विभागाकडे, अन्न-सुरक्षा अधिकारी उपलब्ध नसून, कर्मचाऱ्यांचा मोठ्याप्रमाणात तुटवडा असल्याने, प्रत्येक अन्न आस्थापनाची तपासणी करणे शक्य नसल्याचे, अन्न आणि औषध प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे. एकप्रकारे हा, कायद्यातील कर्तव्यात हलगर्जीपणा करण्याचा गंभीर प्रकार असून, यामुळे अन्न पदार्थांमध्ये भेसळ अथवा गैरप्रकार करण्यास, काही भ्रष्ट-प्रवृत्तीच्या व्यावसायिकांना मोकळे रान मिळू लागले आहे. विशेष म्हणजे, निवडणुकांच्या कालावधीत, अन्न आणि औषध प्रशासनाचे (एफडीए) कामकाज पूर्णपणे थंडावते. कारण, या विभागातील अधिकाऱ्यांवर निवडणुकीच्या कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात येत असते.** आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजासाठीदेखील, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या असल्याची माहिती, प्रसिद्धीमाध्यमांद्वारे प्रकाशित झालेली असल्याने, याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कालिंगम यांना पत्र लिहून, विधानसभा निवडणुकीसाठी, अन्न आणि औषध प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कोकण विभागाने, मागील सहा महिन्यांत अन्न पदार्थांचे एकूण २०९ नमुने घेतले असून, त्यातील २९ नमुन्यांच्या अहवालांपैकी, २२ अन्न पदार्थांचे नमुने हे, अत्यंत सुमार दर्जाचे आढळून आले आहेत. त्यातच आता दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे; तर, त्यानंतर महिन्याभरातच राज्यात विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. अशा परिस्थितीत जर, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कर्मचाऱ्यांची नियुक्ती, निवडणुकांच्या कामकाजासाठी करण्यात आली तर, अन्न पदार्थांत भेसळ करणाऱ्या भ्रष्ट-प्रवृत्तीच्या व्यावसायिकांच्या हातात कोलीत दिल्यासारखे होईल आणि त्यातून विषबाधेसारख्या, जीवितास धोका उत्पन्न होणाऱ्या घटना दुर्दैवाने घडल्याशिवाय राहणार नाहीत, असे 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. तरी, या संपूर्ण प्रकरणाचा सकारात्मक विचार करुन, आगामी विधानसभा निवडणुकांच्या कामकाजासाठी, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कर्मचाऱ्यांची, नियुक्ती करण्यात येऊ नये. जेणेकरुन, पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होऊन, कर्मचाऱ्यांना अन्न आस्थापनांची योग्यपद्धतीने तपासणी करता येईल आणि पुरेशा कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतेमुळे, अन्न पदार्थांमधील भेसळीला मोठ्याप्रमाणात खीळ बसेल, असे ठाम प्रतिपादन नरेंद्र पंडित यांनी, राज्याचे मुख निवडणूक आयुक्त एस. चोक्कालिंगम यांना पाठविलेल्या पत्रात केले आहे.

# अदानींसाठी कायदे आणि महाराष्ट्रहितही पायदळी!

...पृष्ठ क्र. १ वरुन

**६,६०० मेगॅवॅट्सचा संयुक्त प्रकल्प अदानी यांच्या कंपनीला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दिला आहे. सौरवीज ५,००० मेगॅवॅट्स आणि औष्णिक (कोळसा) वीज १,६०० मेगॅवॅट्स, असा एकूण ६,६०० मेगॅवॅट्सचा संयुक्त प्रकल्प अदानी यांच्या कंपनीला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने नुकताच दिला आहे. त्याचे वीजनिर्मिती-पुरवठ्याच्या अर्थतांत्रिक गणिताच्या आधारे केलेले वस्तुनिष्ठपणे परीक्षण वीजेची एकूण मागणी ही २४ तास समान नसते. संध्याकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत कमाल मागणी असते. रात्री १२ ते सकाळी ६ ती सर्वांत कमी असते. त्यानंतर ती वाढत जाते. मात्र कोळसाविद्युत प्रकल्प २४ तास चालवावेच लागतात. मागणीप्रमाणे चालू-बंद करता येत नाहीत. तसेच कोळशाच्या किमती या वाढत्या असतात. किंवा खरे-खोटेपणाने वाढविल्या जाऊ शकतात. त्यामुळे कोळसावीज प्रकल्पातील वीजेची प्रतियुनिट किंमत कायम वाढती असते. प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण तसेच आणि मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठ्याची गरज हे घटक पर्यावरणास हानीकारक ठरतात.**

मात्र, सौर ऊर्जाप्रकल्पाचा प्रत्यक्ष क्षमता वापर हा भारतात एकूण क्षमतेच्या साधारणतः २५ टक्के, तर पवनउर्जाप्रकल्पाचा ३३ टक्के इतकाच असू शकतो. ही वेळ दिवसाची असल्याने त्यावेळी वीजेचा पुरवठा हा मागणीपेक्षा जास्त असतो. दिवसातील सहा तास सौरउर्जा मागणीपेक्षा जादा प्रमाणात झाल्यामुळे, ती साठविण्यासाठी बॅटरीव्यवस्थेची किंमतदेखील मोजावी लागते. मात्र, सौर किंवा पवनउर्जाप्रकल्प एकदा स्थापित झाला की, त्याला कोणताही इंधनखर्च नसतो. एकदा त्याची किंमत ठरली की, त्यात एक नवा पैसादेखील वाढ प्रकल्पाच्या संपूर्ण आयुष्यात म्हणजे, किमान २५ वर्षांत गरजेची नसते. हे त्याचे महत्त्वाचे लाभ आहेत.

### नियामक आयोगाच्या पूर्वसंमतीशिवाय निविदा-

हे कंत्राट देताना महाराष्ट्र सरकार मोदी-शहा-अदानी यांच्या आदेशानुसारच कसे काम करत होते, याचा प्रशासकीय पुरावा म्हणजे निविदा काढण्याची प्रक्रिया आणि तारखा. वीज कायदा २००३ आणि वीज नियामक आयोगाचे अधिकार याविषयीच्या कायदेशीर तरतूदीनुसार, अशा प्रकल्पाचे कंत्राटासाठी निविदा काढताना वीज नियामक आयोगाची पूर्वसंमती घेणे, वीज वितरण कंपनीवर बंधनकारक होते. पण; तरीही, निविदा जाहीर करून कंपन्यांकडून प्रस्ताव मागविले १३ मार्च २०२४ रोजी आणि त्यासाठी मान्यतेचा अर्ज केला, १६ जून २०२४ रोजी! २५ जून रोजी त्याची तातडीची सुनावणी झाली आणि १२ जुलै रोजी आयोगाने किंचितशी नाराजी दाखवत, अदानींना द्यायच्या निविदेला ''पश्चातमान्यता'' दिली. त्यातही गंमत अशी की, या निविदा मागविताना सरकारला इतकी घाई होती की, स्वतः केंद्राच्या उर्जाखात्याच्या मार्गदर्शक सूचनांपासून पूर्ण फारकत घेतली गेली आहे. कारण, त्यात संयुक्त प्रकल्पाला मान्यताच नाही. या अभूतपूर्व प्रकाराचे स्पष्टीकरण देताना महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने नियामक आयोगासमोर कबूल केले की, मे महिन्यामध्ये असणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होणार असल्याने, त्यापूर्वी निविदा काढायच्या होत्या; म्हणून, प्रथम आयोगाकडे अर्ज सादर केला नाही.

### संयुक्त कंत्राटाची रचना अदानींसाठीच

**२०३०-३१ पर्यंतच्या मागणीचा स्वतः वीज वितरण कंपनीने बांधलेला अंदाज मान्य केला तरी, सौर आणि कोळसा अशा संयुक्त प्रकल्पाचे एकत्र कंत्राट देण्याचे काहीही समर्थन नाही. कारण, सौर आणि कोळसा वीजनिर्मिती यांचा परस्परांशी काहीही संबंधच नाही. किंबहुना उपलब्ध सर्व पर्याय आणि त्यांच्या कमी किमतींचा विचार करता, कोळशाच्या नव्या प्रकल्पाची महाराष्ट्राला गरजच नाही. त्यातही, दोन्हींसाठी एकत्र निविदा मागविण्याचे कोणतेही कारण असूच शकत नाही. उलट स्वतंत्र निविदा मागविणे हेच स्पर्धात्मकतेसाठी अत्यावश्यक होते; पण, तरीही किमतींच्या लाभ-हानीचा आणि महाराष्ट्राच्या गरजेचा विचार न करता, संयुक्तच निविदा मागविल्या. कारण, दोन्ही प्रकारच्या वीजनिर्मितीचे मोठे कंत्राट एकत्र घेऊ शकतील, ही शक्यता फक्त अदानींसाठीच होती आणि त्यांना कंत्राट द्यायचेच असे आधीच ठरलेले होते. हे स्पष्ट आहे.**

### सौरउर्जा प्रकल्प गुजरातमध्ये साकारणार?

निविदेमध्ये ५,००० मेगॅवॅट्सचा सौर उर्जाप्रकल्प महाराष्ट्रातच साकारायला हवा, अशी अटच नव्हती. कारण, तो गुजरातमधून साकारणार आहे, हे शिंदे-फडणवीस यांना चांगलेच माहीत असणार. म्हणजे, तेथील जमिनीला भाव मिळणे किंवा काही प्रमाणात रोजगारनिर्मिती इत्यादी कोणतेही अनुषंगिक आर्थिक लाभ महाराष्ट्राच्या पदरात न पडता, ते गुजरातलाच मिळणार आहेत.

**... अजित अभ्यंकर**

# मार्क्स इन सोहो...

## प्रश्नाच्या मुळाशी जाण्याइतकं रॅडिकल दुसरं काहीच नाही!

**टेबलावर पुस्तकांचा ढीग पडलाय, कागदपत्रं पसरलीत. जेवायची वेळ झाली की, तिथं खायच्या बशा, चमचे मांडून वेळ पार पडते आहे. हा पसारा उचलला की, पुन्हा काम सुरु. सलग वाचणं, लिहिणं, चर्चा, मतमतांतरं... मूर व जेनी गढून गेलेत. हे नवरा-बायको. मूर म्हणजे, तरुण कार्ल मार्क्स. जेनी वैतागतेय, ''अरे मूर, तुझं हे भयंकर अक्षर वाचण्यासाठी, मला सर्वोच्च बहादुरीचा किताब मिळायला पाहिजे!'' किंवा ''इतकं तिरकं बोलायची गरज नाही मूर''**


**कामात गढलेले, एकमेकांशी समपातळीवरुन चर्चा करणारे, एकमेकांना खडसावणारे, गंमत करणारे हे नवराबायको व पुढच्या प्रसंगात येणारी त्यांची तरुण मुलगी एलिनॉर, बाकी मित्रमंडळी, त्यांची एकमेकांतली चर्चा, कोपरखळ्या ऐकायला छान वाटणं, यापलीकडे आपल्या दृष्टीकोनांचा प्रवास होतो.**

हे सगळे, एकूण मानवजातीच्या कल्याणासाठीचा, दूरगामी विचार करु पाहाताहेत. त्याचा उगम आहे, अर्थातच कार्ल मार्क्समधून आणि त्याच्यासह 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' लिहिणाऱ्या फ्रेडरिक एंगल्समधून. जेनी या सगळ्याचा अविभाज्य भाग. हे दृश्य १८४५ नंतरचं... सगळा धगधगता काळ.

आयरिश दुष्काळानं लाखो लोक मेलेत, अन्नधान्याच्या किंमती बेसुमार वाढल्यात, लोकांमध्ये असंतोष आहे. ऑस्ट्रिया, फ्रान्स सगळीकडे धग पसरते आहे, पोलंड क्रांतीसाठी तयार आहे... कामगारांची सत्ता येण्यासाठी, ही योग्य वेळ असू शकणार आहे. आयुष्यात मूलभूत कामांसाठी झपाटलेला कार्ल आणि जेनी खाजगी जगण्यात, आपली दोन वेळची भूक भागवण्यासाठी घरातली एकेक वस्तू गहाण टाकताहेत, अगदी पुस्तकंसुद्धा.

**पीपर हा मार्क्सला न आवडणारा मित्र. त्याला एका प्रसंगात सांगतो, ''आम्ही मार्क्सिस्ट सोसायटी ऑफ लंडन सुरु केलीय आणि त्यात आम्ही डॉ. मार्क्सची ओळ न् ओळ वाचतो. त्यांच्या प्रत्येक भाष्यावर एकदिलानं विश्वास ठेवतो!'' तेव्हा मार्क्स उपहासानं म्हणतो, ''हे मी नाही करु शकत, कारण मी मार्क्सवादी नाही!'' जेनी मार्क्सवर वैतागते. तेव्हा पीपर गेल्यावर, तो जेनीला त्याच्या चिडण्याचं कारण सांगतो. ते ऐकताना समाजकारण, राजकीय-सत्ता, कौटुंबिक राजकारणापर्यंत काही गोष्टींवर लख्खकन प्रकाश पडल्यासारखं होतं. मार्क्स म्हणतो, ''कामगार-क्रांती नक्कीच होणार, ती होणार नाही असं मला म्हणायचं नाही; पण, पीपरसारखे लोक सत्तेत येतील याची मला भीती वाटते. जेव्हा यांच्यासारख्यांकडे सत्ता नसते, तेव्हा ते लाळघोटेपणा करतात आणि सत्ता येते तेव्हा गुंडगिरी करतात. हे लोक श्रमिकांचा आवाज होतील; पण, माझं म्हणणं समजून न घेता बोलत राहतील व त्यांचा एक वेगळाच धर्म बनवतील. समाजात एक वेगळी उतरंड तयार करतील, मग तीच मारझोड, तोच रक्तपात! हे सगळं साम्यवादाच्या नावाखाली केलं जाईल. साम्यवादाला अपेक्षित स्वातंत्र्य आणखी दूर ढकललं जाईल. आपल्या सुंदर स्वप्नांवर चिखल उडवला जाईल आणि तो साफ करायला न जाणे अजून किती क्रांत्या कराव्या लागतील! मला भीती वाटते ती, ही!''**

**'सत्य' सांगण्याची घोडचूक केलेल्या मार्क्सला त्याच्या मायदेशातून जर्मनीतून हद्दपार करण्यात येते. तिथून तो येतो पॅरीसमध्ये. मात्र, तिथंही पोलिसांचा ससेमिरा... तिथून बेल्जियम व शेवटी लंडनला मार्क्स स्थिरावतो. (म्हणजे अस्वस्थ राहातो.) मार्क्सचं पुष्कळ महत्त्वाचं लेखन इथंच होतं, लंडनच्या सोहोमध्ये. नाटकात हा भाग न्यूयॉर्कमधील असल्याची कल्पना रचली आहे.**




घर ते लायब्ररी यांच्यामधलं अंतर पार करताना, मूरला पालखी घालावी लागायची. सोहोमधली बकाल वस्ती, कष्टकऱ्यांची, श्रमिकांची. सकाळी लवकर, मूर अर्थात कार्ल मार्क्स लायब्ररीत जायला निघायचा तेव्हा, त्या अंधाऱ्या गल्लीतून गटारीनाल्यांच्या कडेला झोपलेल्या माणसांमधून वाट काढत, ब्रिटिश म्युझियमच्या लायब्ररीमध्ये पोहोचायचा. दिवसेंदिवस अभ्यास करत राहायचा. संध्याकाळी परतायचा तेव्हा, कर्कश ओरडून आपली किरकोळ विक्री करणारे हातगाडीवाले, माकडांचे खेळ करणारे मदारी, हातचलाखीचा चमत्कार करुन, घटकाभर मनोरंजन देणारे जादूगार, गदच्या कोपऱ्याला आपापलं वाद्य घेऊन वाजवत बसलेले गायक, संगीतकार, आयरिश गाणी म्हणाऱ्या भिकारणी, हाकारणाऱ्या वेश्या, झोकांड्या खात फिरणारे दारुडे, कोणाचा डोळा गायब, कोणाचे हातपाय. अशा अवस्थेत युद्धावरुन परतलेले सैनिक, ही सगळी अमानुषता सोहोच्या बकाल गल्ल्यांमधून त्याच्या मनाला डंख मारायची. या अस्वस्थतेतून त्यानं एकूण श्रमजीवनाचा, त्याच्या मोलाचा, त्यांच्या सत्तेचा व्यापक विचार मांडला. हा काळ 'मार्क्स इन सोहो'मधून आपल्याला काहीसा दिसतो.

शतकावर प्रभाव टाकणारा मार्क्स, या विचारवंताच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा तुकडा. त्यानं मांडलेल्या मूलभूत विचारांपैकी काहींचे फायदे आज माणसांना मिळताहेत. ते कुठले हे ज्यानं-त्यानं शोधावं. फार खोदावं लागणार नाही इतके ते ऑब्व्हियस आहेत. उदा. आठवडी सुट्टी, कामाचं समाधान, माणसांचं माणूसपण विकसित होण्याच्या शक्यतांचा निर्देश, खुल्या बाजारी स्पर्धांचं गौडबंगाल, बालमजुरी व बालशिक्षणाबद्दलचे मुद्दे.

हॉवर्ड झीन यांच्या 'मार्क्स इन सोहो' या नाटकाच्या साहिल कल्लोळीने केलेल्या मराठी रुपांतरावर आधारलेलं हे नाटक आहे. 'प्रत्यय', कोल्हापूरची निर्मिती आणि डॉ. शरद भुथाडिया यांचं दिग्दर्शन.

**आर्किटेक्ट शीतल व सचिन पाटील यांच्या मंथन डिझाईन स्टुडिओतील 'मोरिंगा कोर्ट' या सुंदर अंगणात 'मार्क्स इन सोहो' घडत होतं तेव्हा, या मोकळ्या जागेतील जादू कलाकारही सर्व अंगांनी शोधू पाहाताहेत असं दिसत होतं. झाडाखाली, दगडी कट्ट्यावर, पायऱ्यांवर, ओसरीवर थाटलेल्या लिव्हिंग रुममध्ये कलाकार लीलया वावरत होते. 'मार्क्स इन सोहो'तील लहानमोठ्या वयाची सगळी माणसं चर्चा करणारी, जगण्याचा खरा आशय शोधणारी, बुद्धीजीवी व श्रमजीवी माणसांच्या एकूणच एका ग्राउंडवरील सन्मानाविषयी बोलणारी होती. मार्क्सची बायको किंवा त्याला ज्यांची विचाराची पद्धत पटायची नाही, असे समवयीन मित्रच नव्हे; तर, पंधरा वर्षांची एलिनॉरही त्याला प्रश्न विचारु शकायची, टीका करु शकायची. ही माणसं बघताना सभ्यतेचा, संस्कृतीचा अर्थबोध नव्याने होत गेला. मार्क्स म्हणतो की, प्रश्नाच्या मुळाशी जाण्याइतकं रॅडिकल दुसरं काहीच नाही, हे तर पटतंच आहे.**

रसिया पडळकर, आदित्य खेबुडकर, ही प्रत्यक्ष आयुष्यातली लोभस जोडी म्हणजे, मूर आणि जेनी. देहाने केव्हाच मृत्यू, मृत्यूच्या अधीन झालेला; पण, विचार म्हणून जिवंत असणारा व आपल्याला गोष्टीत, चिंतनात नेणारा अत्यंत देखणा ओल्ड मार्क्स डॉ. शरद भुथाडिया, एंगल्सची भूमिका केलेला अक्षय पोळके, एलिनॉर ऋतूजा बडवे, रोहित पोतनीस, सुहास लकडे. शिवाय नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना, वेशभूषा, रंगभूषा, रंगमंच व्यवस्था सांभाळणारे सगळे कलाकार एकेक करुन, पुन्हा समोर येण्याची वेळ फार छान जुळवलीय. नाटकाच्या अखेरचं स्वगत ओल्ड कार्ल मार्क्स करु लागतो व अखेरीस घोषणा करतो की, तो परत आलाय... आणि, त्यानंतर चिअर्स म्हणत बिअरचा घोट घेतो, कोटातला लाल रंगाचा गॉगल घालतो आणि जॉन लेननचं गाणं गुणगुणू लागतो....

*Imagine there's no heaven*
*It's easy if you try*
*No hell below us*
*Above us only sky*
*Imagine all the people living for today....*

या गाण्याच्या पुढच्या एकेका ओळीत सगळे कलाकार नाचत, गात, वाईनचे ग्लास उंचावत सामील होतात...

'मोरिंगा कोर्ट'वर खचाखच भरुन ओतू गेलेले सगळे प्रेक्षक, त्या तालावर तरंगल्याशिवाय राहू शकत नाहीत, इतकं ते संगीत आकर्षक नि आल्हाद देणारं आहे ...विचार/चिंतन नाट्याला हास्यविनोदाच्या, गाण्याच्या लकेरी बाधा आणत नाहीत, खरंच, उलट समजून घेण्याचा ताण निवळून खडतर वाटा/रस्ते सुगम करतात.

***....सोनाली नवांगुळ***

मार्क्सइनसोहो प्रत्यय कोल्हापूर नाटक pratyay
pratyay theatre sonalinavangul

# याने कुछ तो बड़ा होने वाला है ! वाट पाहू या !

**निवडणुका हरियाणात आणि जे त्या जिंकून देतात ते करिश्माई नेते नरेंद्र मोदी कुठे तर झारखंडमध्ये! दुसरे राजकीय सारीपाटच्या चाली चालणारे अमित शहा कुठे तर महाराष्टात! याचा अर्थ काय होतो? आज जिथं प्रत्यक्ष निवडणूक युध्दाचे रणक्षेत्र आहे तिथून भाजपाला जिंकून देणाऱ्या या दोन ''सक्सेस मशीन्स'' अशा दूर दूर का पळताहेत? अर्थात आज गर्भगळीत झालेली भाजपा आणि स्वतःचा आत्मविश्वास हरवलेले हे ''षडयंत्री'' नेते स्वतः तर काही सांगणार नाहीतच. पण, मग हे आपल्यालाच समजून घ्यावे लागेल. नाहीतरी मतदार म्हणून आपली ती गरजही आहे.**

यापूर्वीचा मोदी यांचा इतिहास सांगतो की, ज्या राज्यात निवडणुका तिथे ते आपल्या प्रधानकीचा कारभार सोडून १५ ते १७ रॅलीज करत होते. पाठोपाठ अमित शहा! २०१७ मध्ये उत्तरप्रदेशात १९ रॅल्या! अगदी २०१९ ला याच हरियाणात मोदी यांनी ७ रॅल्या केल्या होत्या. ३ वेळा ये-जा केली होती. आणि आज ते निवडणूक रॅलीची भाषणे जिथे निवडणुका नाहीत तिथे जाऊन ठोकत आहेत. शहा तर महाराष्ट्रात येऊन संघटन आणि तालूका-जिल्हा स्तरीय नेत्यांच्या मिटींगा घेत सुटले आहेत. मोदी, पेपर लिकचा मुद्दा झारखंडमध्ये जाऊन उपस्थित करत आहेत. आणि इकडे राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेशचे विद्यार्थी आंदोलनाद्वारे पेपर लिकचे खापर केंद्र आणि त्यांच्या राज्य सरकारांवर फोडत आहेत. दोन्हीकडे सरकार भाजपाचीच आहेत. याचा अर्थच असा की, हरियाणात आपली हार त्यांनी स्वीकारली आहे. ''निवडणूक जिंकणारे'' अशी जी एक प्रतिमा या दोघांनी उभी केली होती ती आज खतम होण्याच्या मार्गावर आहे. पक्षात त्यांचे स्थान कमजोर झाले आहे, हे यावरून सिध्द होते. काँग्रेसने तर आज उघडपणे एका सणसणीत पत्रकार परिषदेद्वारे त्यावर पक्की मोहरीही लावली आहे.




**''२०२४ च्या निवडणूक निकालाने भाजपाचा अर्धा बोऱ्याबिस्तर तर गुंडाळलाच आहे. उरलेला हरियाणा व त्या पाठोपाठ महाराष्ट्र – झारखंड निवडणूक निकालाने तो पुरता गुंडाळला जाणार आहे, ''हे आजचं सांगून टाकले आहे. त्यामुळेच आज या दोघांविरूध्द RSS ने एक जंगी मोहिम छेडली आहे. भाजपामध्ये म्हणजे जे दोनशेहून अधिक आमदार-खासदार अन्य पक्षातून भाजपात गेले, ते सोडून भाजपा नेतेच आज असा विचार करू लागले आहेत की, आपल्या जुन्या नेत्यांचा जुना जमानाच चांगला होता तेंव्हा सर्वांना इज्जत होती, पैसा हातात खुळखुळत होता! आज काय तर, हे दोनच ''भुजंग''! यातून संघ-भाजपामध्ये एक मोठा प्रश्न विचारला जात आहे की, सर्वच निवडणुकांच्या प्रचार यंत्रणेचा ठेका केवळ गुजराती व्यापाऱ्यांनाच का व कसा काय मिळतो ? बाकी राज्यातील ठेकेदार पध्दतशीरपणे बाजूला का ठेवले जातात? आणि हा प्रश्न तसा महत्त्वाचा आहे.**

हरियाणा राज्यात सर्वात मोठा प्रश्न आज हा विचारला जात आहे की, भाजपा ही निवडणूकच का लढत आहे? कारण, आज भाजपाकडे कसले मुद्दे नाहीत, उमेदवार नाहीत, अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देत सुटलेत आणि जे मुद्दे भाजपा आज मांडत आहे त्यासाठी गेल्या १० वर्षात सत्तेत असूनही काय केले ? हे प्रश्न विचारले जात आहेत. २०२४ च्या निकालाने हे स्पष्ट केले आहे की, केवळ काँग्रेसची, गांधी घराण्याची आपल्या भाषणाद्वारे बदनामी करून आता मते मिळू शकत नाहीत, हे संघ-भाजपाला चांगलेच उमजले आहे. आज भाजपामागे संघ उभा रहात नसेल तर, भाजपाला ''निषाद, कुर्मी, कुशवाह'' आदींच्या ज्या स्थानिय पार्ट्या आहेत, तेवढीही मते मिळू शकत नाहीत, अशी पक्षातच चर्चा झडत आहे. राहूल गांधी यांच्या संविधान, जातीवार जनगणना आणि मोदीने देशात उभी केलेली कार्पोरेटधार्जिणी देशाची अर्थव्यवस्था, या मुद्यांनी आज सामान्य माणसाच्या मनाचा ताबा घेतला आहे. त्यापुढे मोदी-शहांची तिकडमे फेल होत आहेत. जनतेला मोदींची ''लफेदार'' भाषणे आज ''निरर्थक'' वाटू लागली आहेत. घसरणीला लागलेली लोकप्रियता थांबायचं नाव घेत नाही.

दुसरी बाब ! रशिया - युक्रेन युध्दात पेट्रोल - डिझेल - क्रुड ऑईल याचा भारताने आर्थिकदृष्ट्या भरपूर फायदा करून घेतला. पण तो जनतेला दिला नाही आणि आता झारखंड व महाराष्ट्र येथील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतांसाठी पेट्रोल - डिझेलचे भाव ४/२ रुपयांनी कमी करण्याचे ठरत होते इतक्यात, इराण - इस्राईल युध्द पेटले, लेबेनॉनही त्यात आला. त्यामुळे मोदी - शहांची ही रणनीतिही फेल ठरली आहे. कारण, आता क्रुड ऑईलचीच किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात ५ टक्क्याने वाढली आहे. दुसरा सवालही आर्थिकच आहे. आत्तापर्यंत कार्पोरेटस मोदी - भाजपा वर पैसे लूटत होते (पैसा लूटणे हे बारमधील डान्सरवर कसे पैसे लूटले जातात हे सर्वांनी चित्रपटाद्वारे पाहिलेच असेल) ते आता विचार करू लागले आहेत. यापूर्वी भाजपा इलेक्शन हारो - जितो काही एक तिकडम, डावपेच करून ती सत्तेवर येतच होती हे या कार्पोरेटने पाहिले, अनुभवले आहे. लेकीन आज त्याला जबरदस्त ब्रेक लागलाय, हे ते आता अनुभवित आहेत. त्यामुळे त्यांनी भाजपावर आपल्या पैसा लुटण्यालाही ब्रेक लावला आहे. म्हणजे आज भाजपासमोर पैशाचेही संकट उभे राहिले आहे.

**महाराष्ट्राच्या मुंबईत हे संकट फारच बिकट झाले आहे. इथे नॅशनल आणि इंटरनॅशनल कार्पोरेट कंपन्यांची मुख्यालये आहेत. व्यापक बिझनेस आहे. गुजरातच्या किमान टॉप मोस्ट २२ कार्पोरेट - व्यापारी, हे आज मुंबईच्या जिवावरच आजच्या स्टेजला पोहचले आहेत. तेही अन्य काही कार्पोरेटसला सांघिकरित्या अडचणीत आणून ! बाकींच तर सोडाच, मोदींच्या गळ्यातले जे आज ताईत आहेत, अडानी - अंबानी, तेही या मुंबईवरच राज्य करू पहात आहेत. अनंत अंबानी आज उगाच नाही आपला जनसंपर्क या ना त्या निमित्ताने वाढवत आहेत. कशी तरी ''फोडाफोडी'' करून महाराष्ट्रावर ही जी ''असंविधानिक'' सत्ता त्यांनी ''पैसा लुटून'' बनवली आहे, तीच खतम झाली तर काय ? असे मोठे प्रश्नचिन्ह आज कार्पोरेटसमोर उभे आहे.**

आणि ''मुंबई का बादशहा कौन ?.... भिकू म्हात्रे !'' हे राम गोपाल वर्माचे ज्ञान आता उध्दव ठाकरे व शरद पवार यांनाही झाले आहे! पवारांनी तर पुन्हा आपल्या निवडणूक 'चिन्हासाठी' व पर्यायाने निवडणूक आयोगाच्या पक्षपाती निर्णयावर आजच्या नव्या भाजपा कमजोर पडलेल्या स्थितीत न्यायालयाकडे धाव घेतली आहे! त्याची सुनावणी येत्या १५ ऑक्टोबर रोजी आहे! उध्दव ठाकरेही तयारीत आहेतच. यातून ''इंडिया गठबंधन''साठी आणखी सकारात्मक वातावरण निर्माण होणार आहे! आज केंद्रीय दबावापासून मुक्त झालेले न्यायालय काय निर्णय देते हे मोठे मनोरंजक ठरणार आहे.अर्थात मी ''दबाव मुक्त'' असा शब्दप्रयोग जाणीवपूर्वक केला आहे. कारण, मोदी सरकारने गेल्या १० वर्षात ज्या संविधानिक स्वायत्त व स्वतंत्र संस्था एक प्रकारच्या दहशतीने आपल्या अनुकूल करून घेतल्या, त्या विषयी आज प्रत्येक काना कोपऱ्यातून प्रश्न उठत आहेत, या संस्था आपली सामाजिक आणि कायदेशीर विश्वासार्हता गमावून बसल्या आहेत.व त्यांची त्यांना लाज वाटण्याचा हा काळ आलेला आहे. कारण, भाजपाची 'एकहाती' सत्ता आज राज्य दर राज्य त्यांच्या हातून जात असल्याने, पार पार ठिसूळ झाली आहे. शिवाय भाजपाचा नवा अध्यक्ष ही राज्ये हातातून गेली तर, तो मोदी - शहाला कितपत इज्जत देईल, त्यांच्या इशाऱ्यावर कितपत चालेल हाही प्रश्न आहेच !

**मोदी व त्यांची भाषणं आज एक तर हास्यास्पद तरी ठरत आहेत नाही तर, टीकेची तरी ! पक्षातही एक मोठी बेदीली निर्माण झालीच आहे. म्हणून तर, मोदी - शहा वगळता सर्व भाजपाई नेते ठडड च्या स्ट्रेटिजिकल मिटींगला आवर्जून हजर होते !**

**याने कुछ तो बडा होने वाला है ! वाट पाहू या !**

***...विजय घोरपडे.***

# “बैल गेला आणि झोपा केला....”

**महाराष्ट्राच्या साधनसंपत्तीवरील ‘गुजराथी भांडवली-लॉबी’च्या करकचून पडलेल्या विळख्याने ‘मराठी-श्वास’ गुदमरला असताना... मराठी-भाषा ‘अभिजात’ होण्याचा नेमका उपयोग काय आणि तो उपयोग कोणाला...???**

मराठी-भाषा ‘अभिजात’ म्हणून जाहीर करण्यामागचा मूळ कुटील हेतू...जाणून न घेताच किंवा त्याकडे सरळ सरळ दुर्लक्ष करत; ज्यापद्धतीने, स्वतःला साहित्यिक म्हणवणारे एकजात सगळेच महाभाग...गळे काढून तारस्वरात ‘डबल-इंजिन’ सरकारचं (दिल्ली आणि मुंबईस्थित) बेफाम कौतुक करताना दिसतायत...ते पहाता, थोडी तरी त्यांनी ‘‘जनाची नाही तर मनाची’’ राखायला पाहिजे होती, असं वाटल्यावाचून रहात नाही.

**...याच न्यायाने मग, सीतेनं रावणाला आणि मावळ्यांनी औरंगजेबाला, वश व्हायला पाहिजे होतं... कुणी अडवलं होतं त्यांना? अडवलं होतं, ते त्यांच्या आंतरिक ‘नैतिक भूमिके’नं...एक अशी वज्रकठोर ‘नैतिक भूमिका’ जी, फक्त आणि फक्त, ‘‘सत्य, न्याया’’वरच उभी रहाते आणि त्यातून, प्रसवणाऱ्या ‘निष्ठे’चा हात धरुन पुढे चालत रहाते!**

**हे जे कोणी, मराठीला ‘अभिजात’ भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे महाराष्ट्र आणि दिल्लीच्या आसुरी-राजकीय शक्तिंवर एकदम ‘फिदा’ झालेत... ते साहित्यिक कमी आणि ‘बोरुबहाद्दर’ जास्त आहेत!**

हे असले साहित्यिक, म्हणजे फारतर मराठीमनांवर, मराठीभाषेचं ‘गारुड’ घालणारे ‘शब्दप्रभू’ म्हणता येतील... पण, ते मुळातूनच हाडाचे ‘मराठी-हितैषी’ नव्हेतच!

एखादा ‘गारुडी’ जसा साप-मुंगुसाचा खेळ मांडून प्रेक्षकांना रिझवतो व सरतेशेवटी थाळी पसरवून पैसा गोळा करण्याचा पोटार्थी धंदा करतो; तसेच, हे बहुतांश साहित्यिक ‘गारुडी’ आहेत... मराठी-शब्दांचा खेळ मांडत आणि मराठी मनं रिझवत आपलं पोट भरु पहाणारे (आता, ‘अभिजात-भाषा’ दर्जा मराठीला मिळाल्यामुळे त्यातील काहींची पोटं, अगदी तट्ट फुगतील एवढंच); यापलिकडे, त्यांचं मराठी-समाजाला योगदान काय?

...खऱ्याअर्थाने मोडक्यातोडक्या स्वरुपात वा विकलांग अवस्थेत का होईना...पण, ती ‘मायमराठी’ शब्दशः जगवणाऱ्या सर्वसामान्य मराठी-माणसांशी, या साहित्यिक म्हणवणाऱ्यांचं काहीही नातंगोतं नाही किंवा त्यांना त्यांच्याशी काहीही देणंघेणं नाही...(काही सन्माननीय अपवाद वगळता) यांच्यापैकी, कुणीही उन्मत्त ‘व्यवस्थे’ला अंगावर घेणारे ना पु. ल. देशपांडे, ना विजय तेंडुलकर, ना दुर्गा भागवत!

भाषेचा वारसा ‘अभिजात’ आहे की, तिचा वारसा ‘ज्ञात-अज्ञात’ आहे...यामुळे, ती मुळीच जगणार नाही, वाढणार नाही!

**ज्या भाषेची बाजारपेठेतील किंमत घसरत गेल्याने ती अस्तंगताला जाऊ पहाते...ती जगली काय, नी मेली काय...दोन्हीत तत्त्वतः फारसा फरक नाहीच; कारण, ती ज्यांच्या ओठांवर असते...ते ‘ओठ’ भांडवली-व्यवस्थेने आपल्या दमनकारी-यंत्रणेच्या दाभणाने शिवून टाकलेले असतात!**

**...त्या अशा ‘मायबोली’साठी ‘मरणपंथ’ तर, तेव्हाच अंथरुन तयार ठेवलेला असतो; जेव्हा, तिची भर ‘बाजारातली पत’ आणि जोडीला ती बोलणाऱ्यांची ‘आर्थिक ताकद वा क्रयशक्ति’ उतरणीला लागलेली असते!**

**मराठी भाषा जरुर ‘अभिजात’ ठरावी, तशी ती आहेच... पण, ती कुणाच्या हातून व्हावी, यालाही महत्त्व आहे!**

...ज्यांनी ‘महाराष्ट्रधर्म’ भरबाजारी बुडवला-तुडवला, शिवबा-संतांचा महाराष्ट्र पहाता पहाता पार नासवला; तेच जेव्हा, असं पाऊल उचललात; तेव्हा, ते असं पाऊल भाषेच्या निखळ प्रेमापोटी वा ती मायबोली असलेल्या माणसांच्या कल्याणासाठी नव्हे; तर, आपल्या हातून निसटू पहाणारी ‘आसुरी-सत्ता’ राखण्याच्या एकमात्र उद्देशाने उचलत असतात!




- **सिंधुदुर्गातला शिवछत्रपतींचा पुतळा ज्यांच्या भ्रष्टाचार व बेपर्वाईने कोसळला....**
- **न्यायदेवता ज्यांनी साफ भ्रष्ट केली, म्हणून वर्षानुवर्षे न्यायालयातून निकाल लावले जात नाहीत किंवा लागलेच तरी, न्याय मिळण्याची शक्यता झाकोळलेली रहाते....**
- **ज्या दुर्गामातेचा उत्सव साजरा होत असतो, त्या महिलाशक्तिचीच नव्हे; तर, अगदी चिमुरड्या मुलींचीदेखील महाराष्ट्रात अब्रू हालहाल करुन सर्रास लुटली जातेय....**
- **आणि, बदलापूरसारख्या अनेक प्रसंगी तर, या सरकारच्या तालमीत तयार झालेले पोलीस, अशा भयानक प्रसंगीदेखील स्वतःचे हितसंबंध जपू पहातात आणि आंदोलकांवर मात्र, वरच्या आदेशाने खटल्यांचा ससेमिरा लावतात....**
- **महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या कंपन्या-कारखान्यांमधून ‘कंत्राटी’ मराठी-तरुणपिढीचं ‘माणूसपण’, गुजराथी ‘भांडवलदार-लॉबी’कडून (ज्यांच्या जीवावरच व ज्यांच्या हितासाठीच, मुंबई आणि दिल्लीची ‘डबल-इंजिन’ सरकारं चालतायत) राजरोस पायदळी तुडवलं जातं...**

तेव्हा, यातले किती साहित्यिक कधि रस्त्यावर उतरले होते, याच सरकारचा निषेध करण्यासाठी?

या साऱ्या अन्याय-अत्याचार-शोषणावर अत्यंत कठोर शब्दात प्रहार त्यांनी केल्याचं किंवा ‘भांडवली-व्यवस्थे’च्या पालखीचे भोई बनलेल्या, या साहित्यिकांच्या साहित्यातून त्याचं जळजळीत प्रतिबिंब उमटल्याचं...खरंच दिसतं कधि???

‘कोमसाप’चे अध्यक्ष वगैरे झालेल्या मधु मंगेश कर्णिक यांचं वानगीदाखल उदाहरण घेऊया...जेव्हा आम्ही जीवाची बाजी लावून ‘विनाशकारी-विकासा’चं मूर्तिमंत प्रतिक असलेल्या जैतापूर अणुऊर्जा-प्रकल्पाविरोधात आंदोलन करत होतो; तेव्हा, या गृहस्थांनी घाईघाईने प्रकल्पाच्या समर्थनार्थ लिहिलेल्या उत्तम बांधणीच्या ‘‘जैतापुरची बत्ती’’ या पुस्तकाच्या हजारो प्रती, नारायण राणेंच्या माणसांकरवी कोकणात सर्वत्र फुकट वाटल्या जात असताना...आमच्यासोबत असलेले निधड्या छातीचे आंदोलक स्व. विक्रांत कर्णिक त्यांना फोन करुन विचारते झाले होते, ‘‘तुमच्या ‘जैतापुरची बत्ती’ या पुस्तकाच्या ‘बत्ती’ला ‘तेल’ कुणी पुरवलं, ते सांगा!’’ (अर्थातच, समोरुन तत्काळ फोन ठेवण्यात आला, हे वेगळं सांगायला नकोच!)

तेव्हा, मराठी भाषा ‘अभिजात’ होण्याचा अभिमान आहेच... पण, ती बोलणाऱ्या, ती जगवणाऱ्या जिवंत हाडामांसाच्या सामान्य मराठी-माणसांचा, जरा थबकून आपण मुळातून कधि विचार करणार?

मराठी भाषा, ‘अभिजात’ जाहीर झाल्याने, त्यांच्या परिस्थितीत लक्षणीय फरक पडणार असेल; तरच, त्या घोषणेचं उरभरलं स्वागत होण्यात जरुर अर्थ आहे!

पाशवी-वासवी शक्तिंनी मला अगदी ‘स्वर्गसुख’ उपलब्ध करुन दिलं; तरी, ते मी मागचापुढचा विचार न करता, क्षणभरात लाथाडून देईन, ...एवढी मोठी भारतीय-अध्यात्माला (अर्थातच, शिवबा-संतांच्या जाज्वल्य ‘हिंदुत्वा’लाही) अभिप्रेत असलेलीच नव्हे; तर, अगदी लगडून असलेली अपेक्षा...भांडवली-व्यवस्थेची ‘बटीक’ बनलेल्या या लोकशाहीत, वंचित मराठी-जनसमुदायाकडून बाळगता येत नाही...हे व्यवहारतः मान्यच!

**...पण, लाडक्या बहिणीची तुटपुंजी ओवाळणी असो (बहिणी लाडक्या; तर, ‘कंत्राटी-कामगार पद्धती’त ‘पिचले’ जाणारे, आरपार ‘चेचले’ जाणारे करोडो करोडो ‘भाऊ’, या सत्ताधाऱ्यांचे ‘दुश्मन’ आहेत काय...हा प्रश्न नको विचारायला?) .... निवडणुकीच्या काळात, सत्ताधाऱ्यांकडून होणारं फार मोठं पैसे वाटप वगैरे असो...अथवा, दाखवली-दिली गेलेली इतर आमिषं असोत...त्यातून, महाभारतातल्या धृतराष्ट्रासारखं ‘आंधळेपण’ न येता, डोळसपणे ‘मतदान’ करता येणार नसेल...तर, महाराष्ट्रातल्या मराठी-माणसाला, साक्षात ‘ब्रह्मदेव’ जरी वरुन खाली उतरला; तरी, वाचवू शकणार नाही...मग, मराठी भाषा ‘अभिजात’ बनण्याची, सामान्यांच्या दृष्टीने बिनकामाची बात तर, कामी येणं सोडाच...!!!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ‘‘सॅमसंगसारख्या भारतातील सरसकट सगळ्याच मल्टीनॅशनल कंपन्यांची मस्ती एकदाची उतरवाच.....’’

**सिटू (CITU...सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स) या मार्क्सवादी–कम्युनिस्ट पक्षाच्या (जो तामीळनाडूत DMK आघाडीचा सहयोगी पक्ष आहे) संघटनेशी संलग्न असलेल्या ‘सॅमसंग इंडिया वर्कर्स युनियन’ने पुकारलेला संप, पोलिसी–दडपशाहीला झुगारुन सप्टेंबर ९–२०२४ पासून सुरु असून, कदाचित उद्याच्या बुधवारी (दि.१७ ऑक्टोबर–२०२४) तो संपेलही; पण, त्याचं ‘कवित्व’ दीर्घकाळ शिल्लक राहीलच!**

**...चांगल्या दर्जाचं अन्न कॅन्टीनमधून देणे, कामगार–कर्मचारीवर्गाला येण्याजाण्यासाठी वातानुकूलित एसी–बसेस पुरविणे आणि कामगारांच्या लॉकर्सना उत्तम दर्जाची कुलूपे देणे वगैरे किरकोळ मागण्या व्यवस्थापन पूर्ण करायला तयार आहे; पण, युनियनशी वाटाघाटी करायला तयार नाही...म्हणून, युनियन–मान्यतेसाठीच प्रामुख्याने हा संप झालेला आहे.**




तामीळनाडुतील बहुतेक सर्वच DMK आघाडीतील राजकीय पक्ष, या संपाला पाठिंबा देत असताना, तेथील भारतीय जनता पक्ष (BJP) मात्र, संपाला विरोध करताना दिसतोय; याचाच अर्थ, या संपाला पाठिंबा देऊन ‘राजकीय लाभ’ पदरात पडण्याची शक्यता दिसत असूनही ‘भाजप’, ती संधि साधायला तयार नाही...एवढा, त्यांचा ‘कामगारद्वेष’ व कामगार–कर्मचारीवर्गाप्रतिची ‘शत्रुत्वाची भावना’, त्यांच्या हाडामांसात खिळलेली आहे व सदैव जितीजागती आहे!

श्रीपेरुम्बुदूर...जिथे, भारतात ‘संगणक–युग’ आणणाऱ्या (ज्या ‘संगणक–युगा’ला, तेव्हा भाजप–संघ परिवाराने अदूरदर्शीपणे कडवा विरोध केला होता) लोकप्रिय माजी पं. राजीव गांधी यांची दुर्दैवी हत्या झाली होती, तेथील सॅमसंग कंपनीच्या मनमानी पद्धतीने ‘दादागिरी’ करणाऱ्या व्यवस्थापनाने (Indulging in Corporate-Terrorism), थेट युनियनच्या नावातील ‘सॅमसंग’ या ‘ब्रॅण्डेड’ नावाच्या वापरालाच आक्षेप घेतलेला दिसतोय! युनियन्स, या काही कुठल्या नफा कमवू पहाणाऱ्या माल वा सेवा उद्योगात गुंतलेल्या नसतानाही आणि अगदी, “Nominative Fair Use’’, हे तत्त्व (ज्याद्वारे, कंपनीच्या ब्रॅण्ड लोगोचं प्रारुप युनियनचा कंपनीशी असलेला ‘जैविक–संबंध’ दर्शविण्यासाठी व वैशिष्ट्य समजून येण्यासाठी मंजूर झालेलं असताना) अमेरिकन न्यायालयांनी केव्हाचंच मान्य केलेलं असतानाही ‘सॅमसंग’ कंपनी स्वतःला समजते तरी कोण? स्वतःच्याच मूळ द. कोरिया देशात मात्र, तेथील राजकीय–व्यवस्थेसमोर अगदी आज्ञाधारक मुलासारखे हे चूपचाप असतात; कारण, तेथील सरकार, कामगारांचं ‘कैवारी’ असतं...**आपण चीनशी युद्धात गुंतलेलो असल्याच्या वर्ष १९६२पासून ते १९७९च्या कोरियन–अर्थक्रांतीच्या कालावधीत, अंदाजे सरासरी ९.३ टक्क्यांपर्यंत राष्ट्रीय–ढोबळ उत्पन्नवाढीचा व ३३.७ टक्क्यांपर्यंत निर्यातीचा वेग राखणाऱ्या कोरियन–अर्थव्यवस्थेनं जाणिवपूर्वकच सुरुवातीपासून आपल्या देशातील कामगार–कर्मचाऱ्यांसाठी ‘‘उच्चतम वेतन–संरचने’चं ‘‘High-Wage Model of Economy’’ कठोरपणे राबवलं होतं आणि त्याची गोडमधुर फळं, आज समस्त कोरियन–जनतेला चाखायला मिळतायत! याचाच अर्थ, युरोप खंडातील नॉर्वे, नेदरलँड, स्वीडन, जर्मनी वगैरेचं नव्हे; तर, आशिया खंडातील दक्षिण कोरिया आणि तैवानसारख्या देशांनीही आर्थिक–प्रगतीचा चमत्कार साधताना, आपल्या देशातील कामगार–कर्मचारीवर्गासाठी उच्चतम–वेतनपातळी राखण्याची दक्षता घेतलीय. स्वित्झर्लंडसारख्या देशातील सरकारने तर, सर्वोच्च ‘किमान–वेतन’ पातळी कठोरपणे बंधनकारक करताना, तेथील उद्योगपतींनी परकीय देशांमधून आणल्या जाणाऱ्या कर्मचारीवर्गासाठी तरी, त्या कडक नियमात मागितलेली सूट,** तत्काळ धुडकावून लावली होती!

**...या पार्श्वभूमीवर, आपल्या देशातली कामगार–कर्मचारीवर्गासंदर्भातील अत्यंत शोचनीय परिस्थिती काय दर्शवते? आपण त्यात झपाट्याने सुधारणा करण्याऐवजी, आपल्या मोदी–शहा भाजपाई–संघीय ‘कामगारघातकी’ व ‘कामगारद्वेष्ट्या’ सरकारने...२०२० मध्ये कोविड–काळाचा गैरफायदा घेऊन ‘‘४ काळ्या कामगार–कायद्यांची ‘काळी कामगार–संहिता’ देशात लागू केलीय’’, हे किती संतापजनक आहे!**

१९८९ साली बी. आर. सिंग विरुद्ध भारत संघराज्य दाव्यात कामगार–संघटना (युनियन्स) बनवणं व चालवणं, हा भारतीय राज्यघटनेअंतर्गत कलम १९(१) (क) खाली कामगार–कर्मचारीवर्गाचा (अलिकडे तर, पांढरपेशा कर्मचाऱ्यांना युनियन–सदस्य होण्याचा अधिकारच नसल्याची ‘आवई’ महाबदमाष असलेला बहुसंख्य HR/IR अधिकारीवर्ग उठवत असतो व महामूर्खासारखे त्या ‘अपप्रचारा’ला बळी पडून कर्मचारी आपलं फार मोठं आर्थिक–नुकसान करुन घेऊन, व्यवस्थापकीय–दहशतीला हकनाक बळी ठरत असतात) घटनात्मक ‘मूलभूत–अधिकार’ असून, तो कुठलंही सरकार सत्तेवर आलं; तरी, ते सरकार अथवा ...पृष्ठ क्र. १० वर

...पृष्ठ क्र. ९ वरुन

भारतातील कुठल्याही कंपनीचं व्यवस्थापन कधिच हिरावून घेऊ शकत नाही...अगदी आपत्कालीन स्थितीत कामगार-कर्मचारीवर्गाकडून 'अंडरटेकिंग' लिहून घेतल्याच्या नावाखाली अथवा कुठल्याही करारा-मदाराद्वारे वा अन्य कुठल्याही धाकदपटशाने, हा युनियन करण्याचा व चालवण्याचा 'घटनात्मक-अधिकार' कुणीही रोखूच शकत नाही...तसेच, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (ILO...International Labour Organisation) १९८१मधील 'सांघिक-वाटाघाटी सनदे'च्या (Collective Bargaining Convention) कलम २ मध्येही, हे तत्त्व अंतर्भूत आहेच; ज्यावर, भारत-सरकारने सही केलेली आहे.

"Right to strike is a corollary to the right to organise", हीच 'आंतरराष्ट्रीय कामगार संघटने'ची (ILO) धारणा होय...

भारतीय कामगार-चळवळीचे जनक व 'मुंबई गिरणी महासंघा'चे संस्थापक तसेच, १८८१ व १८८४ मधील दोन कामगार-आयोग व १८९१ चा कामगार-कायदा करण्यास ब्रिटीश सरकारला भाग पाडणाऱ्या 'नारायण मेघाजी लोखंडे' (१८४८-१८९७), यांच्या पावलावर पाऊल ठेवत... १९१८मधील अहमदाबाद मिल्सच्या संपाचं नेतृत्त्व करत म. गांधींकडून याच "संप करण्याच्या कामगार-हक्का"ला अधोरेखित करण्यात आलं होतं.

१९३७ साली सिनेटमध्ये भाषण करताना, भूतपूर्व अमेरिकन अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी, "संप करण्याचा हक्क, नाकारणे आणि अंमलात आणणे...यातला फरक म्हणजे, 'लोकशाही' आणि 'जुलमी एकाधिकारशाही' मधल्या फरकासारखाच होय!", असं यासंदर्भात महत्त्वपूर्ण प्रतिपादन केलं होतं. सध्याचे अमेरिकन अध्यक्ष जो बायडेन यांनी, कामगारविषयक नियम बदलून अमेरिकन कामगारांना 'युनियन' करण्यास पूर्ण मोकळीक बहाल केलीय (म्हणूनच, कंपनी-दहशतवादाचं आजवर थैमान घालणाऱ्या 'अमेझॉन' कंपनीत, प्रथमच कुठली युनियन होऊ शकलीय) व "मी अमेरिकेच्या इतिहासात 'कामगारांचा कैवारी' असलेला अध्यक्ष, अशी स्वतःची नोंद मागे ठेऊन जाऊ इच्छितो," असं बायडेन यांनी कामगार-हितार्थ वक्तव्य केलंय!

**'सॅमसंग'सारखी कॉर्पोरेट्स तुमच्याकडे फक्त 'ग्राहक' म्हणून पहातात, यापलिकडे तुमच्यात त्यांना कसलाच रस नसतो...तुमच्या, 'कामगार-कर्मचारी' नावाच्या जिवंत हाडामांसाची माणसं असण्याला, त्यांच्या लेखी काहीच किंमत नसते! या कॉर्पोरेटीय-सिद्धांतानुसार, तुमच्या आयुष्याचा एकमात्र उद्देश 'खरेदीदार व खरेदी केलेल्या वस्तुंचा उपभोक्ता', एवढाच मानला जातो आणि तुमचं जे काही काम करणं किंवा उदरनिर्वाहाचं जे काही साधन आहे ते, केवळ त्याच्या परिपुर्तीसाठीच योजलेली बाब असते. कामाच्या ठिकाणी तुम्हाला कसं वागवलं जातं, तुम्हाला तिथे कुठल्या स्थितीत वावरावं लागतं आणि त्याचा तुमच्या मानसिक-शारिरीक आरोग्यावर काय परिणाम होतो; एवढंच नव्हे तर, तुमच्या व्यक्तित्वावर, तुमच्या एकूणच सन्मानाने व सुखासमाधानाने 'जगण्यावर' (Identity) याचा काय परिणाम होतो...याची या कॉर्पोरेटीय-सैद्धांतिक व्यवस्थेला पत्रास बाळगण्याचं कुठलंच कारण नसतं. कामाच्या ठिकाणी लावलेले CCTV कॅमेरे व तुमचं मिनिटा-सेकंदाची काम टिपणारी इतर आधुनिक तंत्रसाधनं... तुम्हाला, तुम्ही केवळ, निर्जीव 'रोबो' असल्यासारखीच जाणीव व भावनाशून्य-संवेदनाशून्य वागणूक ते देत रहातात...ज्यामुळे, केवळ मानसिक ताण आणि रक्तदाब वाढणंच केवळ होत नाही; तर, स्वतःविषयी एक सुप्त घृणाच हृदयाच्या अंतर्हृदयात ठाण मांडून बसू लागते.** कामावर जाण्यासाठी तुम्हाला मरणाच्या गर्दीतून तासनतास प्रवास करावा लागतो, नोकरीच्या ठिकाणी कामाचे वाढलेले तास व वाढलेला मानसिक त्रास; तसेच, वाढलेली नोकरीची 'सुरक्षितता'...याचा दररोज सामना करावाच लागतो, ज्यातून तुमच्या माणूसपणावर

...पृष्ठ क्र. ११ वर

# 'सॅमसंग' संपकरी-कामगारांच्या ऐतिहासिक विजयाचा अन्वयार्थ....

(लेख अनुक्रमांक १)



**९ सप्टेंबरपासून सुरु झालेला हा संप, अपेक्षेनुसार ३८ दिवसांनंतर १७ ऑक्टोबरला 'सिटू''प्रणित 'सॅमसंग इंडिया वर्कर्स युनियन'ने (SIWU) ऐतिहासिक यश मिळवून मागे घेतला आणि सॅमसंगसारख्या इतर अनेक बहुराष्ट्रीय (Multinational) कंपन्यांच्या भारतातील मनमानी कारभाराला चांगलाच चाप लावला!**

**झालेल्या समझोत्यानुसार....**

- कामगारांनी लोकशाहीपद्धतीने व स्वेच्छेने निवडलेल्या युनियनशी, पगार-बोनस वाढीसाठी युनियनने दाखल केलेल्या 'मागणीपत्रा'वर (Charter of Demands...'COD') चर्चा करायला उद्दामपणे व बेकायदेशीररित्या नकार देणाऱ्या सॅमसंग-व्यवस्थापनाला, या संघर्षाने नीतिनियमानुसार संबंधित युनियनशी वाटाघाटी करण्यास भाग पाडले गेलेले आहे.
- आपल्या न्याय्यहक्कांसाठी संप करणाऱ्या, संपकरी-कामगारांवर आकसाने कुठलीही कारवाई न करण्याचे व्यवस्थापनाला कबूल करावे लागले आहे.
- सर्वात महत्त्वाची बाब जर कुठली असेल; तर, ती या संप-काळातील ३८ दिवसांचा पगार, संपकरी कामगार-कर्मचारीवर्गाला देण्यास व्यवस्थापनाला बाध्य करण्यात आलेलं आहे... आणि, हा या संघर्षपूर्ण सॅमसंग-घडामोडीतून कामगारांच्या हिताच्या दृष्टीने, कामगारविश्वाच्या इतिहासाला एक नवा अध्यायच जोडला गेल्याचं गौरवाने म्हणावं लागेल.

**...कारण, आपल्या मनमानी व हुकूमशाही कारभाराने कामगार-कर्मचारीवर्गाची पिळवणूक तर करायचीच; वरुन त्यांच्या 'माणूसपणा'वरच गदा आणून त्यांना गुलामगिरीत राबवून घ्यायचं आणि त्याविरोधात, आवाज उठू नये म्हणून, प्रथमतः कंपनीत युनियनच तयार होऊ द्यायची नाही अथवा कार्यरत असलेली युनियन, कंपनी-दहशतवादाचा व कामगारांमधील नीच-अधम प्रवृत्तींना हाताशी धरुन बेकायदेशीर 'फोडाफोडी-तंत्रा'चा वापर करत मोडीत काढायची... हा हल्ली, औद्योगिक-सेवा क्षेत्रातील एक कामगारघातकी प्रघात किंवा रिवाजच तयार झाला होता.**

...त्याविरोधात कोणी संप करायची हिंमत केलीच तर, तो संप पोलिस बळाचा व बाऊन्सर्स वगैरे कंपनीबाह्य (भाडोत्री गुंडगँग) गुंडशक्तिचा वापर करुन मोडीत काढायचा शिरस्ताच बनला होता. याशिवाय, व्यवस्थापनाच्या, या असल्या "अनुचित कामगार प्रथां"च्या बेदरकार अवलंबामुळे (Unfair Labour Practices) कामगारांना संप करायला भाग पाडलेल्या संपकाळातील पगार, "काम नाही तर, दाम नाही" (NO WORK, NO PAY) या अन्यायकारक सुत्रानुसार कामगार-कर्मचारीवर्गाला देण्याचा प्रश्न, मुळातूनच अलिकडे निपटूनही टाकण्यात आला होता...या सर्व, फार मोठ्या कॉर्पोरेटीय-षडयंत्राला, सॅमसंगच्या कामगार-एकजुटीने जबरदस्त हादरा दिलाय, हे या संपलढ्याचं फार मोठं फलित आहे आणि त्यातून, अवघं 'कामगारविश्व' योग्य तो बोध घेईल, अशी आशा करुया...धन्यवाद!

***...राजन राजे***

*(अध्यक्ष : धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)*

(क्रमशः)

...पृष्ठ क्र. १० वरुन

व तुमच्या कुटुंबाच्या सौख्यावर गंभीर परिणाम होत जातो... पण, ही नवी 'भांडवली-व्यवस्था' तुम्ही तक्रार करताच, तुम्हाला बजावते की, ''बघा, तुम्ही तुमच्या आईबडिलांपेक्षा सुखसंपन्न आहात, तुमची मिळकत आणि त्या मिळकतीतून तुमची खरेदीशक्ति किंवा क्रयशक्ति गेल्या काही वर्षात वाढलेली आहे! 'अर्थशास्त्रीय-मांडणी'पेक्षा, ही सगळीच राजकीय स्वरुपाची मांडणी आहे... हे उघडंनागडं स्वार्थी-संवेदनशून्य कॉर्पोरेटीय-राजकारणच होय!

**सॅमसंग कंपनीच्या संपाच्या पार्श्वभुमीवर, हाती आलेली एक बातमी म्हणजे, त्याच द. कोरिया देशातल्या प्रख्यात 'ह्युंदाई इंडिया' या भारतातील ह्युंदाईच्या उपकंपनीच्या, दहा रुपये दर्शनीमूल्य असणाऱ्या, समभागांची (शेअर्स) १८६५ रुपये ते १९६० रु. या 'प्राईस-बँड'मध्ये धडाक्यात विक्री सुरु आहे...पूर्ण भरणा झाल्यास, त्यातून २७,८७० कोटी रुपये जमा होतील. (म्हणजे, भारतीय IPO इतिहासातील हा एक उच्चांकच ठरणार)... कंपनीच्या समभागांचं मूल्य (शेअर्सचे भाव) गेल्या २८ वर्षात २०० पटीने वाढले; म्हणजेच, दरवर्षी अदमासे २१% चक्रवाढ-पद्धतीने वाढत गेले असतील; तर, यांचे नफे किती अगडबंब आहेत, याची जरा कल्पना तरी करुन बघा...भारतासारख्या देशांमधील 'अतिस्वस्त' असलेल्या कामगार-कर्मचारीवर्गाची (Cheap and Flexible Labour) घोर पिळवणूक करत राहिल्यानेच, हे शक्य झालेलं आहे (ग्राहकांची लूट, ही अजून एक स्वतंत्र वेगळीच बाब) ...जे त्यांच्या मूळ देशात त्यांना करता येणं अशक्यच असतं!**

सॅमसंग कंपनीच्या संपाच्या पार्श्वभुमीवर, हाती आलेली दुसरी बातमी म्हणजे, तामीळनाडुतीलच चेन्नईमधील 'टीम डिटेलिंग सोल्युशन्स' या कंपनीने आपल्या कामगार-कर्मचारीवर्गाला 'दिवाळी-भेटवस्तू' म्हणून ''मर्सिडीज बेंझ, मारुती, टाटा'' कंपन्यांच्या कार्स व महागड्या बाईक्स दिल्याची सनसनाटी निर्माण करणारी बातमी येऊन थडकलीय, हे विशेष! या निमित्ताने, मागे सुरतच्या आपल्या कामगार-कर्मचाऱ्यांना सरसकट फ्लॅट्स व चार चाकी मारुती गाड्या 'दिवाळी-भेट' म्हणून दिल्या होत्या, हे ही आठवलं...पण, या गोष्टी घडतात, त्या अपवाद म्हणून अभावानेच...नियम मात्र वेगळंच काही सांगत रहातो!

...म्हणूनच, सातत्यपूर्ण सामाजिक चळवळ व आंदोलन करत, लोकशाहीमार्गाने मतपेटीतून 'व्यवस्था-बदल' घडवून...या भांडवलशाही-व्यवस्थेचं लवकरात लवकर उच्चाटन व्हायला हवं आणि समाजवादी-साम्यवादी-समतावादी 'समाजरचना' अस्तित्वात यायलाच हवी...जय हो!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

# महात्म्या, तू आज तुझ्या पार्थिव देहात हवा होतास रे....

**महात्म्या, बरोबर १५५ वर्षांपूर्वी तू ट्याँहा ट्याँहा करत रडत जन्माला आलास खरा; पण, तेव्हा नियती प्रसन्न मुद्रेनं हसत होती...जशी ती कधि शाक्यराजा शुद्धोधन आणि राणी माया यांच्यापोटी सिद्धार्थ गौतम जन्माला आला होता, तेव्हा हसली होती!**

**...हे असं काहीही असलं; तरी, नियतीने महात्म्या, जन्मक्रम चुकवलाच! ५ मे-१८१८ ला जन्म घेणाऱ्या कार्ल मार्क्सऐवजी तू आणि तुझ्याऐवजी, तुझ्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑक्टोबर-१८६९ रोजी कार्ल मार्क्स जन्माला आला असता तर? तर, कदाचित आज जी नृशंस, शोषक, अत्याचारी स्वरुपातील 'भांडवलशाही' जगभरात धुमाकूळ घालत मानवजातीसह अवघ्या सजीवसृष्टीच्या अस्तित्वालाच वेठीला धरु पहातेय**...त्या, अंति विनाशकारी 'भांडवली-व्यवस्थे'ऐवजी जगभरात 'गांधीवाद-साम्यवाद-समाजवादा'ची (Gandhism-Communism-Socialism), जग व जन कल्याणकारी रुजवात झाली असती...पृथ्वीवरील जगणं, हा मानवासह सर्वच प्राणिमात्रांसाठी आनंददायी सोहळा झाला असता, ज्याचं वर्णन रामायणातल्या 'रामराज्या'त आणि महाभारतल्या 'गोकुळा'त, पांडवांच्या 'इंद्रप्रस्था'त सापडतं! कारण, अगदी उघड आहे की, ''गांधीवाद आणि मार्क्सवाद, यांचा विलक्षण मिलाफ होत...मार्क्सची 'वर्गविहीन समाजरचने'ची क्रांती, ही रक्तरंजित 'वर्गसंघर्षा'तून न येता, रक्तविहीन जागृतीद्वारे 'वर्गसमन्वया'तून अवतरली असती'' आणि म्हणूनच, फलद्रूप ठरुन चिरस्थायी बनली असती.

महात्म्या, तू स्वतःचा देहच नव्हे; तर, जगताच्या कल्याणासाठी...आपलं अवघं जगणंच, एक कठोर तपश्चर्या पहाणारी 'प्रयोगशाळा' बनवलीस आणि तुझ्या 'सत्याच्या प्रयोगा'तून जे नवनीत बाहेर पडत होतं...ते भारतवर्षासह सगळं जगच, आकण्ठ प्राशन करत असतानाच...ज्या क्रौर्यपूर्ण रक्तपाताला तू जगातून नाहिसा करु पहात होतास; तोच तुझ्या नशिबी आला...

कुणी नीचात्म्यांनी, तुझ्या देहाची रक्तलांछित चाळण केली, त्यालाही आज पाऊण शतक उलटून गेलं!

...आदि-अंत नसलेल्या काळाच्या उंबरठ्यावर पाऊणशतकी मापटं, उलथून टाकलं जात असतानाच...राक्षसी-महात्त्वाकांक्षेनं युद्धग्रस्त झालेल्या या जगाला आणि त्यातूनच, तप्त-ज्वरग्रस्त बनलेल्या वसुंधरेला, शांत-संयत करण्यासाठी कधि नव्हे एवढी तुझी निकड भासतेय...

**तू जर आज असतास; तर, खचितच आपला देशच काय, संपूर्ण जगच...आज ज्या भयशंकित अवस्थेत अन्याय-अत्याचार ग्रस्त झालंय, तसं कधिच झालं नसतं!**

...सरतेशेवटी, प्रत्यक्ष असण्याची एक अदम्य ताकद असते... म्हणूनच तर, त्या नीचात्म्यांनी...त्या पापात्म्यांनी, तुला जगातून नाहीसा करण्याचा घाट घातला! अनेक प्रयत्नांति ते एकदाचे यशस्वी झाले खरे...पण तरीही, तुझ्या काटकुळ्या देहातलं, तुझ्या निर्लेप आत्म्याचं 'निशाण' फडफडत उच्चरवाने जगाला दीपस्तंभासारखी योग्य दिशा आजही...न थकता, निराश न होता दाखवू पहातंय, त्या फडफडत्या चिरंजिवी 'निशाणा'ला तुझ्या जन्मदिनी 'धर्मराज्य-सलाम'...!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



ज्येष्ठ पत्रकार, लेखक, प्रकाशक आणि आय.आय.एम. अहमदाबाद येथे, सलग १८ वर्षे विद्याशाखा सदस्य असलेले, श्री. परंजय गुहा ठाकूरता यांनी, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची सदिच्छा भेट घेतली. गुरुवार, दि. १७ ऑक्टोबर-२०२४ रोजी, 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाणे कार्यालयात पार पडलेल्या या भेटीत, देशातील सद्य राजकीय, सामाजिक परिस्थिती यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ व अर्थशास्त्राचे अभ्यासक श्री. विश्वास उटगी हेदेखील उपस्थित होते. दरम्यान, दि. २४ जानेवारी-२०२३ रोजी, प्रकाशित झालेल्या, गौतम अदानी यांच्यावरील हिंडेंनबर्ग संशोधन अहवालात, अदानी यांनी केलेले अपारदर्शक आर्थिक व्यवहार, लाचखोरी आणि पर्यावरणाचे उल्लंघन यांसह, ते अनेक संशयास्पद पद्धतींमध्ये गुंतल्याचा आरोप करण्यात आला होता. याच अहवालात श्री. परंजय गुहा ठाकूरता यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. या अहवालामुळे, अदानींच्या शेअर्समध्ये लक्षणीय घट होऊन, अदानी समूहातील कंपन्यांच्या व्यवहारांच्या चौकशीची मागणी करण्यात आली होती. परिणामी, याच पार्श्वभूमीवर, मा. राजन राजे यांच्यासोबत झालेल्या या चर्चेला महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी श्री. विश्वास उटगी यांनीदेखील, गौतम अदानी यांच्या अनेक गैरव्यवहारांचा पाढा वाचून दाखवला. या बैठकीत, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, आपण गेल्या चार दशकांपासून कंत्राटी-कामगारपद्धत आणि प्रस्थापित राजकीय व्यवस्थेविरोधात जो काही संघर्ष उभा केलाय, त्याची माहिती श्री. परंजय गुहा ठाकूरता यांना देताच, त्यांनी मा. राजन यांच्या संघर्षमय अशा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि कामगार चळवळीतील योगदानाचे कौतुक करुन, त्यांच्या लढवय्या व्यक्तिमत्त्वाला सलाम ठोकला !!!

# आपण कोणत्याही विचारांचे असा... पण, महाराष्ट्रीयन 'मराठी-माणूस' म्हणून, वेळ काढून वास्तव जरुर वाचा!

## ''भाजपाच्या गुजराती नेत्याला ओरिजनल शिवसेना का संपवायची आहे?

## ही सल आहे, कुबेर नगरी हातातून निसटल्याची...

## ''ही सल आहे, आंतराष्ट्रीय व्यापार-उद्योग असलेल्या शहरावरील कब्जा गेल्याची. ही सल आहे, आर्थिक राजधानी असलेल्या महापालिकेवर ताबा नसल्याची...!!!''

**१९६० ला जे जमलं नाही, त्याचा ''बदला'' घेण्याची तयारी....**

**स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारत कधीही अखंड देश नव्हता. छोटी छोटी संस्थाने आणि थेट ब्रिटिश अंमलाखाली असलेले प्रांत मिळून स्वातंत्र्यानंतर आजचा 'भारत देश' अस्तित्वात आला. भारताची मूळची प्रांतीय स्वायत्तता कायम ठेवण्याचे वचन घटनेने लोकांना दिले होते. प्रांतांची निर्मिती कशी करावी यावर खूप चर्चा झाली. अखेरीस पंतप्रधान नेहरुंनी भाषावार प्रांत रचना करण्यास मान्यता दिली. त्यानुसार देशातील सगळे प्रदेश निर्माण झाले. मात्र गुजरात आणि महाराष्ट्र निर्माण कारण्यावरुन मोठा वाद झाला. मराठी भाषिक असूनही विदर्भ मध्यप्रदेशचा भाग होता, तो महाराष्ट्रात येण्यास अनुकूल नव्हता हे एक कारण आणि मुंबई महाराष्ट्राला की, गुजरातला द्यायची हे दुसरे कारण. शेवटी मराठी भाषिक विदर्भ प्रांत वगळून व गुजराथी भाषिक राजकोटच्या उत्तरेकडील प्रांत वगळून 'द्विभाषिक राज्य' निर्माण करण्यात आले. त्याची राजधानी मुंबई होती व मुख्यमंत्री होते मोरारजी देसाई. मराठी भाषिक जनतेला केंद्राचा हा निर्णय मान्य झाला नाही. दरम्यान, यशवंतराव चव्हाण साहेबांना विदर्भातील जनतेची समजूत घालण्यात यश मिळाले. त्यांनी वैदर्भीय मराठी भाषिकांची मने जिंकली व विदर्भ महाराष्ट्रात सामील होण्यास तयार झाला. आता एकच वाद शिल्लक राहिला होता, मुंबई कोणाला द्यायची? महाराष्ट्राला की, गुजरातला? दोघेही हक्क सांगत होते. त्यावेळी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे म्हणून मोठी चळवळ सुरु झाली.**

**सेनापती बापट, भाई डांगे, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, आण्णाभाऊ साठे, एस. एम. जोशी, अहिल्याबाई रांगणेकर आदी दिग्गज नेत्यांनी आंदोलन सुरु केले. तरीही गुजराथी लोक मुंबई सोडण्यास तयार नव्हते. अखेर आंदोलनाने उग्र रुप धारण केले. मुंबईत प्रचंड मोर्चे निघू लागले. एक मोर्चा फ्लोरा फाउंटन चौकात अडविण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. पण मोर्चाने जोरदार मुसंडी मारली. मुख्यमंत्री मोरारजी देसाईंनी गोळीबाराचा आदेश दिला.**

**या गोळीबारात १०५ मराठी मोर्चेकऱ्यांचे प्राण गेले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी ते हुतात्मा झाले.**

हाच फ्लोरा फाउंटन चौक आज हुतात्मा चौक म्हणून ओळखला जातो. तेथे हुतात्म्यांचे भव्य स्मारक उभे केले आहे.

मोर्चावर झालेल्या अमानुष गोळीबाराने संपूर्ण देशात खळबळ माजली. आपल्याच लोकांना गोळ्या घालून ठार मारण्यासाठी स्वातंत्र्य मिळवले आहे का? असा सवाल केंद्राला विचारला जाऊ लागला. संपूर्ण महाराष्ट्रातील वातावरण प्रक्षुब्ध झाले. नेहरुंनी मोरारजी देसाईंचा मुख्यमंत्री पदाचा राजीनामा घेतला व यशवंतराव चव्हाण यांना द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री केले.

मराठी जनतेचा रोष कमी करण्याचा हा प्रयत्न होता. परंतु,





संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन अधिक उग्र होत गेले. दरम्यान, देशाचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी केंद्राचा निषेध करीत मंत्रिपदाचा राजीनामा दिला. केंद्रावर दबाव वाढत होता. पण, नेहरु अस्वस्थ होते. कारण मुबईतील गुजराथी लोकसंख्येने कमी असले तरी सगळा उद्योग, व्यापार त्यांच्या हातात होता.

केवळ मुंबईच नव्हे; तर, देशातील जवळपास सगळा व्यापार गुजराथींच्या हातात होता. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताला आपले अर्थकारण डळमळीत होणे परवडणारे नव्हते. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण चतुराईने परिस्थिती हाताळत होते, केंद्रावर दबावही वाढवत होते. संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन अधिकच व्यापक झाले होते. अत्रे, डांगे यांच्या भाषणांनी सगळा देश हादरत होता आणि गोळीबाराचा विषय केंद्राला फारच त्रासदायक झाला होता.

**या सर्वांचा परिणाम होऊन १ मे १९६० साली मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. मुंबई महाराष्ट्राला दिली याचा मोठा रोष गुजराथी जनतेच्या मनात होता व त्यांनी या निर्णयाला विरोधही केला पण, त्यांचे काही ऐकले गेले नाही. मुंबई हातातून निसटली याची 'सल' तेंव्हापासून गुजराथी जनतेच्या मनात खोल रुतून बसली आहे.**

मुंबई... देशाची आर्थिक राजधानी! ती आपल्या हातात असली पाहिजे, अशी प्रत्येक केंद्रीय नेत्याची सुरुवातीपासून अपेक्षा आहे. शिवाय, मुंबई 'कॉस्मोपॉलिटन' सिटी आहे. देशातील अनेक भाषिक लोक या शहरात राहतात. भविष्यात काहीही विपरीत घडू शकते हा धोका ओळखून महाराष्ट्रातील तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी व नेत्यांनी मुंबईवर मराठी भाषिकांचे संरक्षण वर्चस्व कायम राहावे व मराठी जनतेचा आवाज बनून तिच्या हक्कांसाठी लढणारी एखादी संघटना असावी, असा विचार मांडला. त्यावेळी, अभ्यासू व आक्रमक वक्ता असलेल्या बाळासाहेब ठाकरे या तरुणाची मा. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी निवड करून त्यांना पुढाकार देऊन संघटना उभी करून, तिचे नेतृत्व करावे, हे ही निश्चित झाले. आणि यानंतर मराठी माणसांच्या ...पृष्ठ क्र. १३ वर

...पृष्ठ क्र. १२ वरुन

न्याय्यहक्कांसाठी बाळासाहेब ठाकरें यांनी 'शिवसेना' स्थापन केली. तेंव्हापासून आजपर्यंत मुंबईतील मराठी जनतेचा आवाज बनून शिवसेना काम करीत आहे.

राजकीय पटलावर शिवसेनेने अनेकदा वेगवेगळी भूमिका घेतली असली व प्रसंगी हिंदुत्ववादी विचाराला पाठबळ दिले असले तरी, मुंबईत आजही मराठी माणसांसाठी ओरिजनल शिवसेना आक्रमकपणे रस्त्यावर उतरते.

**केंद्रातून ज्या ज्या वेळी मुंबई 'केंद्रशासित' करण्याचा प्रयत्न झाला, त्या प्रत्येक वेळी मुंबईत ओरिजनल शिवसेनेने उग्र आंदोलन करुन केंद्राचा डाव हाणून पाडला, ही वस्तुस्थिती आहे. केंद्रात सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्या प्रत्येक सरकारचे धोरण मुंबई ताब्यात घेण्याचे असते. काँग्रेस व भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयाविरोधात जाण्याची त्यांच्या पक्षाच्या राज्यातील नेत्यांची हिंमत नसते. अशावेळी 'ओरिजिनल शिवसेना' हिमतीने व आक्रमकपणे केंद्राच्या विरोधात उभी राहते हे पूर्वी अनेकवेळा सिध्द झाले आहे. त्यामुळे मुंबईवर ताबा घेण्यातील मोठा अडथळा 'ओरिजिनल शिवसेना' आहे हे ओळखून शिवसेनेलाच मोडून काढण्याचा धूर्त राजकीय 'डाव' खेळला गेला आहे.**

केंद्रात भाजपाचे सरकार आहे. पंतप्रधान आणि गृहमंत्री गुजरातचे आहेत. या सरकारची मातृसंस्था असलेल्या आरएसएसला मुंबईशी काही देणेघेणे नाही आणि वेगळा विदर्भ झाल्यास तो त्यांना हवाच आहे. आरएसएसची ही मूळचीच भूमिका आहे. भाषिक प्रांत रचनेऐवजी छोटी छोटी राज्ये करण्याचे भाजपाचे धोरण पहिल्यापासून आहे. यापूर्वी केंद्रात सत्तेत आल्यावर त्यांनी ते करुन दाखवले आहे. २०२४ नंतर देशात आणखी नवीन राज्ये निर्माण करणार असल्याचे ना. उमेश कत्ती या त्यांच्याच कर्नाटकच्या मंत्र्याने जाहीर केले आहे. २०२४ च्या निवडणुकीनंतर भाजपाचेच सरकार येणार, हे त्यांनी गृहीत धरले आहे.

महाराष्ट्र फोडून त्याची तीन राज्ये करणार असेही हा मंत्री बोलून गेला आहे. महत्त्वाचे म्हणजे १९६० साली मुंबई आपल्याला मिळाली नाही, याची खंत प्रत्येक गुजराथी माणसाच्या मनात आहे. तेच गुजरातकर आज देशात सर्वोच्च सत्तास्थानी आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार केल्यास आपल्या लक्षात येईल, त्यांना 'ओरिजिनल शिवसेना' संपवणे गरजेचे का वाटते !

**महाराष्ट्रात २०१४ साली भाजपाचा मुख्यमंत्री झाला. त्यानंतर काय काय घडले याचाही थोडक्यात आढावा घेऊ. मुंबईतील जवळपास सगळी महत्त्वाची केंद्रीय कार्यालये अहमदाबादला अथवा दिल्लीला हलवण्यात आली. मुंबई गोदीतील कामकाज कमी केले व सगळे काम गुजरात गोदीतून सुरु केले, जेएनपीटी बंदराचे महत्त्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारचा प्रचंड निधी खर्च करुन सुरतजवळ नवे बंदर बांधण्यात आले, मुंबई बंदराकडे येणारी जहाजे गुजरात बंदराकडे वळवली, मुंबईतील आंतरराष्ट्रीय 'हिरे व्यापार' सुरतला नेण्यात आला, मुंबईतले मुख्य पासपोर्ट ऑफिस दिल्लीला हलवले, बोरीबंदरला असलेले देशाचे मुख्य पोस्ट ऑफिस दिल्लीला नेले, रिझर्व बँकेचे गव्हर्नर आता मुंबई ऐवजी दिल्लीत बसू लागले, मुंबईतील अनेक मोठे उद्योग गुजरातला गेले, धुळे-नंदुरबार भागातील महाराष्ट्राचे हक्काचे पाणी गुजरातकडे वळवण्यात आले... आणखी कितीतरी विषय सांगता येतील. पण, त्यावेळचे मुख्यमंत्री फडणवीस किंवा भाजपा सरकारने कसलाही आक्षेप घेतला नाही किंवा विरोधही केला नाही. किंबहुना, फडणवीसांच्या पाठिंब्यानेच मुंबई व महाराष्ट्राला कमकुवत करण्याचे कारस्थान यशस्वीपणे पार पाडले. महाराष्ट्रात भाजपाला त्यांचीच सत्ता का हवी आहे, याची ही कारणे आहेत.**

एक वर्षांपूर्वी मुंबई विमानतळ एका गुजराती उद्योगपतीला दिले. त्याने लगेच मुंबई विमानतळाचे छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ हे नाव बदलून एक उद्योजक याने स्वतः चे 'अदानी विमानतळ' नाव दिले. त्यावेळी फक्त ओरिजनल शिवसेनेनेच अत्यंत आक्रमक होऊन विरोध केला व तोपण 'डाव' हाणून पाडला. आपल्या मार्गातील मोठा अडथळा 'ओरिजिनल शिवसेना' आहे, हे त्यांनी जाणले आहे.

मुंबई महापालिकेची सत्ता ओरिजनल शिवसेनेकडून खेचून घेणे हा ही एक छुपा मनसुबा आहे. महापालिकेच्या माध्यमातून सरकारच्या गुजरातधार्जिण्या निर्णयांना ओरिजनल शिवसेना विरोध करेल, ही भीती त्यांना आहे. पण, ओरिजनल शिवसेनेला मुंबई महापालिकेत पराभूत करणे सोपे नाही, याचीही जाणीव मोदी-शहांना आहे.

मुख्यमंत्री असताना फडणवीसांनी मुंबई महापालिका भाजपाच्या ताब्यात घेण्याचा जोरदार प्रयत्न केला होता. शिवसेनेच्या पाठींब्यावर राज्यात सत्ता असूनही भाजपाने मुंबई पालिकेत शिवसेनेला विश्वासघाताने संपवण्याचा प्रयत्न केला, हा इतिहास ताजा आहे. शिवसेनेचे तुकडे केल्याशिवाय ती शक्ती कमकुवत होणार नाही व आपला हेतू साध्य होणार नाही, ही खूणगाठ बांधून मोदी-शहा कामाला लागले आहेत आणि फडणवीस त्यांना मदत करीत आहेत. सुरुवातीला किरीट सोमय्या या व्यापारीवृत्तीच्या गुजराथी नेत्यामार्फत शिवसेनेच्या आमदार खासदारांच्या मागे इडी, सीबीआय, इन्कमटॅक्स, एनसीबी या केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा लाऊन त्यांना दबावाखाली घेतले आणि आता राजकीय खेळी करुन त्या आमदारांना फोडण्यात यशही मिळवले. परिणामी, शिवसेना दुबळी करायची व तिची विरोधाची शक्ती संपवायची. आपला छुपा अजेंडा पूर्ण करायचा आणि मुंबई केंद्रशासित करायची.

**शिवसेनेपुढे आज उभा राहिलेला राजकीय पेचप्रसंग हा 'त्यांचा' राजकीय 'डाव' आहे. हिंदुत्व व शिवसेनेच्या अस्तित्वाचा बेबनाव करुन 'कट' रचण्यात आला आहे. लोकांची दिशाभूल केली जात आहे. अनेक वर्षांपासून मनात रुतून बसलेली 'सल' त्याशिवाय निघणार नाही. १९६० साली जे जमले नाही त्याचा 'बदला' घेतला जात आहे.**

**विचार करा आणि ठरवा आपण काय करायचे ते?**

**(कोणी लिहिलं माहित नाही; पण, महाराष्ट्र राज्य निर्माण झाले, तेव्हापासून ते आजपर्यंत ज्या घटना घडल्या त्या वास्तव लिहिले आहे, महाराष्ट्रीयन माणसांने विचार करून प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचवावे ही विनंती.)**

*(समाजमाध्यमातून साभार...)*

---

**धनुष्यबाण-कमळ-घड्याळ छाप... एकनाथ-देवेंद्र-अजित, या ट्रिपल-इंजिन सरकारची ही आहे 'असलीयत'... बाकी, 'हिंदुत्व' वगैरे तोंडी लावण्यापुरतं आणि महामार्ग-उड्डाणपूल वगैरे काँक्रिटचा-विकास हा... 'न भूतो, न भविष्यति' अशा अतिप्रदीर्घ (पन्नास पन्नास वर्ष) मुदतीची कर्जे काढून ती फेडण्यासाठी पुढील पिढ्यांना वेठीला धरत; त्यातून, टोल-उत्पन्न, कंत्राटातली भरभक्कम टक्केवारी आणि निवडणुकीत भरघोस मतं (छद्म विकासाच्या नावाखाली मिळणारी...जो, फक्त आणि फक्त, मुठभरांच्या हितासाठी आणि सत्तेसाठी सुरु आहे व जो अंति सजीवसृष्टीसह मानवी-अस्तित्वाला घातकी ठरणार आहेच) मिळवण्यासाठी केवळ! रामायणातला राम किंवा शिवछत्रपती यांच्याविषयी खोटी आस्था दाखवणाऱ्या सत्ताधाऱ्यांची मुलंमुली 'भांडवली-व्यवस्थे'शी हातमिळवणी करत 'प्रसाद लाड' सारखीच 'कंत्राटदार-नगरसेवक-आमदार-खासदार' बनत बडे धनपती व सत्ताधीश बनणार आणि आपली मुलंमुली यांच्या ताब्यातील बनणार 'कंत्राटी-कामगार पद्धती'तले 'गुलाम व नवअस्पृश्य'...!!!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

**''दोन वर्षांच्या काळात हे लाडक्या बहिणींचं लाडकं सरकार, लाडक्या भावांचं आणि लाडक्या शेतकऱ्यांचं लाडकं सरकार झालंय'', असं जे दसऱ्याच्या 'भाषण'रुपी 'कथावाचना'त मुख्यमंत्री दामटून म्हणाले...त्याच्यापुढे जात, ''लाडक्या 'कामगार-कर्मचाऱ्यांचं लाडकं सरकार'', असं म्हणण्याची मात्र मुख्यमंत्र्यांची हिंमत झाली नाही!**

**'ईडी'च्या दहशतीपोटी, 'भाजप' या नंबर १ च्या भांडवलदार-धार्जिण्या व 'कामगारद्वेष्ट्या' पक्षाच्या वळचणीला जात... तीन काळ्या कामगार कायद्यांची 'काळी कामगार-संहिता'** (Black Labour-Code) **लादून कामगार-कर्मचारीवर्गावर शेतकरी, मुसलमानांपाठोपाठ महाराष्ट्रभरात 'बुलडोझर' फिरवायला निघालेत, हे घटनाबाह्य पद्धतीने व बेकायदेशीररित्या मुख्यमंत्रीपदावर बसलेले, एकनाथराव...तशीही त्यांची, सदसद्विवेक बुद्धी केव्हाचीच मरुन गेलेली असली; तरीही, प्रत्येकालाच कुठे न् कुठे अंशतः तरी, परमात्मा 'अपराध-बुद्धी' अथवा 'अपराधीपणाची जाणीव'** (Guilty Conscious) **देत असतोच, हेच यातून दिसून येतं...!!!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

**एवढी वर्षे ठग-भिल्लांसारख्या लुटारु असलेल्या 'भगव्या-गुलाबी' टोळीमधल्या 'कमळ-धनुष्यबाण-घड्याळ' छाप टोळांनी...महाराष्ट्रभरातल्या टोलनाक्यांवरुन जनतेच्या खिशावर 'टोळधाड' घातली ('फास्टॅग' नाही म्हणून, जबरदस्तीने 'दुप्पट-टोल'ही वसूल करुन झाला) ...हजारो-लाखो कोटी रुपये दिवसाढवळ्या लुटून फस्त केल्यावर; निवडणूक जवळ येताच, साताऱ्याच्या 'मोरुला जाग आली' अन् EVM-मतपेटीतून कितीही 'मतचोरी' केली; तरी अख्खी 'टोळांची वस्ती'च उध्वस्त होणार, आपण 'ओसाड गावचे राजे' होणार... म्हणून, पोटावरुन (याखेपेस, दाढीवरुन नव्हे) हात फिरवत, दिल्लीच्या दिशेनं एक मोठा ढेकर देत मोरुने 'टोलमुक्ति' दिली; तरीही, 'शेतकऱ्यांची कर्जमुक्ती' आणि कामगारांची 'कंत्राटी-पद्धतीतून मुक्ती' करायचीच राहून गेली, हे उभा महाराष्ट्र विसरु शकेल, असं वाटतं मोरुला...???**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# प्रत्येक निवडणुकीचे निकाल लागले की, मुख्य माध्यमं असोत; की, सोशल मिडिया असो; की, विचारवंत समीक्षक असोत, या सगळ्यांना घाई होते.

भाजप आणि संघाच्या केडर, बूथ व्यवस्थापन आणि निवडणूक व्यवस्थापन कौशल्याच्या कौतुकाचे पूल बांधायची; तशीच, कथित सोशल इंजिनिअरिंग म्हणजे, जातीच्या राजकारणात कोण जिंकल याचा उहापोह करण्याची आणि सोबत मेलेल्या काँग्रेसपक्षावर अजून दोन चार धपाटे घालायची.

हे सगळे भेकड आणि बुळगे विचारवंत ट्रोल होण्याला घाबरतात, आयोगाला घाबरतात की, आणखी कुणाला घाबरतात कुणास ठाऊक.

झापड ओढून बसलेल्या लोकांना साधे बेसिक प्रश्न पडत नाहीत की, मतदारांना हे तद्दन मूर्ख आणि बावळट समजतात?

**जगभरात कागदी मतपत्रिका वापरल्या जात असताना, अमेरिका सुद्धा कागदी मतपत्रिका वापरत असताना, आपल्याला मशीन्स का हवेत आणि आपल्या निवडणूक यंत्रणेत काही दोष असू शकतात, हे तुम्ही मान्यच करत नाहीत, हा नेमका कुठला बोटचेपेपणा?**

**नाशिक महानगरपालिका निवडणुकीत घडलेलं उदाहरण.**

एका अपक्ष उमेदवाराला शून्य मत पडलेले. त्याचं मतदान त्याच प्रभागात असताना, माणूस किमान स्वतःला मतदान करेल, निदान त्याची लेकर बायको मतदान करतील, शून्य मतदान? तरीही हे भंगार लोक मशीन निर्दोष म्हणून टिऱ्या बडवतात. अशी वेळोवेळी अनंत उदाहरण समोर आलेली आहेत.

**२०१९च्या निवडणुकीत नेमकी किती मतदान झालं आणि किती मतं मोजली गेली याची अचूक आकडेवारी निवडणूक आयोगाला वेबसाईटवर टाकायला, दीड वर्षे वेळ झाला नाही तो कशामुळे?**

**सगळं संगणकावर असताना दीड वर्षे का लागावेत?**

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ७९ जागांवर मतदानाची आकडेवारी आणि मतमोजणीच्या वेळची मतांची आकडेवारी यामध्ये तफावत आहे आणि या फरक असलेल्या जागांवर भाजप जिंकलेली आहे.**

**एक दोन हजार नव्हेत; तर, १९ लाख ईव्हीएम मशीनचा हिशोब लागत नाही, त्याची याचिका कोर्टात अजूनही तशीच पडून आहे, कुठे गेलीत १९ लाख मशिन्स?**

**लोक बावळट असतील पण, एवढेही बावळट नाहीत.**

**निदान शेतकरी नक्कीच माठ आणि बावळट नाहीयेत. लखमीपूर खिरीमध्ये जिथे शेतकरी चिरडून मारले तिथल्या अठरा जागा भाजपने जिंकल्या.**

त्याच जिल्ह्यात भाजपचे नेते फिरकत नव्हते, त्यांना अनेक ठिकाणी गावातून हुसकून लावलेलं होतं. शेतकरी चिरडून मारलेल्या गावात, आंदोलन सुरु असताना, आणि त्यानंतर ज्या पद्धतीने केंद्रीय मंत्री उद्दामपणे पदावर बसून राहिला त्याबद्दल सातत्याने शेतकरी संताप व्यक्त करत असताना अवघ्या सहा आठ महिन्यात झालेल्या निवडणुकात लोक सगळे विसरून भाजपला निवडून देतात? आणि हे तुम्हाला पचतं?

हाथरसमध्ये भाजपचा उमेदवार निवडून येतो? एवढ कांड झाल्यावर पण? गोरक्षकाच्या झुंडीने माणसं मारलीच; पण, तपास करणारा पोलीस अधिकारी पण मारला, नागरिकत्व कायद्याच्या वेळेस, शेतकरी आंदोलनाच्या वेळेस प्रत्येकवेळेला सामान्य लोकांना तुडवून काढल्यावर पण लोकांनी एवढं भरघोस मतदान केलेलं आहे?

**विकासाच्या नावाने लोकांनी मतदान केलं, असले अचाट दावे लोक बेशरमपणे करतात.**

**११० रुपये पेट्रोल आणि १०० रुपये डीझेल घेऊन, ४५ वर्षातली सगळ्यात जास्त बेरोजगारी, बंद पडणाऱ्या कंपन्या आणि बुडणाऱ्या बँका घेऊन कसला केळाचा विकास साधला जातोय?**



**मतदानाला गेलेले भय्ये पुन्हा बोचके डोक्यावर घेऊन मुंबईत पोट भरायला येणार असतील तर, लिहिणाऱ्या पत्रकाराची फटफटी काय पाण्यावर चालते काय?**

**बरं हे झाल्यावर लगेच बिनतोड सवाल केला जातो, पंजाब मध्ये काय?**

ममतादीदी वाजपेयी सरकारमध्ये मंत्री होत्या. त्यांचा राजकीय इतिहास जे विसरलेत आणि ज्यांना त्यांना दुर्गा वगैरे उपमा द्याव्याश्या वाटतात त्यांच्यासाठी हे तथ्य विसरलं जातंय का? बंगालमध्ये ममता दुसऱ्यांदा आल्या त्यावेळी भाजप दुसऱ्या क्रमांकावर आलाय आणि काँग्रेस/डावे संपले.

पंजाबमध्ये 'आप'ने भाजपचा पराभव केलाय का? तिथे काँग्रेस आणि अकाली दोन्ही संपले. भाजपला तिथं तसही गमवायला काहीही नव्हतं.

अतिशय गांभीर्याने सांगतोय, ममता दीदी आणि केजरीवाल हे दोघेही एकाधिकारशाहीपद्धतीने राज्य चालवणारे नेते आहेत, भलेही ते लोकशाहीमार्गाने निवडून आलेले असले तरीही.

प्रत्येकवेळेला ज्या राज्यात भाजपला गमवायला काहीही नसतं तिथेच दुसरा पक्ष निवडून येतो हा योगायोग अतिशय दुर्मिळ आहे.

प्रत्येकवेळेला सदोष निवडणूक यंत्रणेवर टीका केली की, भाजप निवडून न आलेलं एक राज्य दाखवून सगळे नामानिराळे होतात, जिथे भाजपला काहीच गमवायचं नव्हतं तिथे गमावले कुणी हा प्रश्न मात्र कुणालाच पडत नाही.

सगळे पत्रपंडित हिंदुत्व कार्ड चाललं म्हणून बिलं फाडून मोकळे होतात. त्यांच्याकडे भाजपच्या ओस पडलेल्या सभा, मोकळ्या खुर्च्या, भाजप नेत्यांना झालेली गावबंदी आणि शेतकरी आंदोलनात असलेला लोकांचा आक्रोश, शेतकरी आंदोलनात दिलेली आश्वासनं न पाळण्यामुळे जाहीरपणे शेतकऱ्यांनी केलेली टीका यावर काय उत्तर आहे? हे सगळंच फक्त 'हिंदुत्व' एवढ्याच मुद्द्याखाली कानाडोळा करावं इतकं सोपं आहे ?

**युपी मध्ये मतपेट्या आणि मशीन्सची वाहतूक करताना झालेला गलथानपणा सगळ्यांनी पाहिलेला आहे, तिथं सुरक्षेसाठी गुजरात पोलीस का मागवले? महाराष्ट्र पोलीस, छत्तीसगड पोलीस, तामिळनाडू पोलीस का नाही बोलावले?**

**ज्यांना ज्यांना म्हणून वरील प्रश्नांची समाधानकारक उत्तर सापडलेली आहेत ती मांडावीत.**

**आम्हाला राजकीय पंडितांएवढं ज्ञान नसलेही; पण, आम्हाला माणसांच्या जगण्याचे प्रश्न महत्वाचे वाटतात, अश्या भारतातले आम्ही नागरिक आहोत. आम्हाला वरील प्रश्न पडलेले आहेत आणि त्याचं उत्तर आमच्यासाठी या आणि यापुढे होणाऱ्या निवडणुका निव्वळ धूळफेक असणारेत.**

गुजरात मॉडेल नावाचा खोटारडेपणा करून निवडून आलेले, १५ लाख फक्त जुमला होता म्हणणारे , फोटोशॉप करूनच प्रचार करणारे, मिडीयाला हाताशी धरून विखारी प्रचार करणारे , कोरोनाच्या आपत्तीमध्ये सुद्धा पीएम केअर फंड काढून पैसे लाटणारे, स्वायत्त संस्था मोडीत काढून सगळ्या यंत्रणा बटीक करणारे लोक निवडणुका निष्पक्ष आणि अतिशय अचूक करतात यावर ज्यांचा भरवसा आहे, अशा लोकांच्या बुद्धीला कोपरापासून दंडवत.

हात जोडून विनंती करतो, मतदारांना इतकं पण बेअक्कल आणि गाढव समजू नका आणि त्यांना बाद म्हणून सिद्ध करू नका!

*...आनंद शितोळे*

# ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर, वाढत्या प्रकाश-प्रदुषणाबाबतही निकष ठरविण्यात यावेत!

## 'धर्मराज्य पक्षा'ची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : गेल्या काही वर्षांत मेट्रोसिटी व स्मार्टसिटीच्या नावाखाली, ठाणे आणि मुंबई, नवी मुंबईसारखी शहरे ध्वनी प्रदूषण तसेच, वायू प्रदूषणाने ग्रासलेली आहेत. या तीनही शहरांतील हवेचा दर्जा खालावलेला असून, त्याचा विपरीत परिणाम हा, सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचे दिसून येत आहे. याच अनुषंगाने 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांना पत्र लिहून, ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर, वाढत्या प्रकाश-प्रदुषणाबाबतही निकष ठरविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.** 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, डॉ. अविनाश ढाकणे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मुंबईचे धाकटे भावंडं अशी ओळख असलेले आणि एकेकाळी, तलावांचे शहर अशी ओळख असणाऱ्या ठाणे शहराचे, गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात नागरिकीकरण झाले. ठाणे शहर अक्षरशः उभे-आडवे फोफावले. परिणामी, वाढत्या लोकसंख्येसोबतच वाहनांची संख्या वेगाने वाढत गेली आणि त्यामाध्यमातून ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषणाने, सारस्वतांचे व कष्टकरीवर्गाचे सांस्कृतिक शहर ग्रासून गेले. त्यातच निसर्ग आणि पर्यावरणावर घाला घालून होणारी किंवा होऊ घातलेली विकासकामे, काँक्रीटचे वाढते जंगल, मेट्रो प्रकल्प, रस्ते विकास आणि रुंदीकरणाची कामे, यामुळे 'स्मार्टसिटी' बनलेल्या ठाणे शहराची शांतता भंग झालेली आहे.

**गेल्या काही वर्षांपासून ठाणे शहरातील राममारुती रोड व गोखले रोड या वर्दळीच्या रस्त्यांसह, हिरानंदानी कॉम्प्लेक्स, वर्तकनगर परिसर, माजिवडा नाका आणि ठाण्यातील अनेक ठिकाणी स्थानिक दुकानदार-व्यापाऱ्यांच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणात विद्युत रोषणाई केली जाते. तसेच, काही झाडांवर उच्च-विद्युतक्षमतेचे प्रकाशझोत सोडले जातात. त्यामुळे ध्वनी प्रदूषण व वायू प्रदुषणासोबतच; आता, प्रकाश-प्रदूषणदेखील सुरु झालेले आहे. या प्रकाश-प्रदूषणामुळे, वातावरणातील काही सूक्ष्मजीव बाधित होण्याबरोबरच, झाडांवरील उच्च विद्युतक्षमतेच्या प्रकाशझोतामुळे, रात्रीच्या वेळेस झाडांच्या फांद्यांवर आणि घरट्यांमध्ये विश्रांती घेत असलेल्या पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण तर होतोच;** मात्र, त्याचबरोबर त्यांच्या नैसर्गिक अधिवासावर, या प्रकाशझोतामुळे धोका उत्पन्न होत, पक्षांच्या जीविताचा प्रश्न निर्माण होत असल्याचे नमूद करुन, आगामी निवडणुकांच्या माध्यमातून, विविध राजकीय पक्षांकडून, या प्रकाश-प्रदूषणात वाढ होऊन गंभीर परिस्थिती निर्माण होण्याचा धोका जास्त असल्याचे नमूद करीत, अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या प्रकाश-प्रदूषणामुळे, निसर्गचक्र बिघडण्याचे फार मोठे संकट उभे ठाकलेले असून, ज्याप्रमाणे ध्वनीची मर्यादा मोजण्यासाठी 'डेसिबल' हे प्रमाण वापरले जाते आणि ध्वनीमर्यादेचा भंग करणाऱ्या संबंधितांवर, न्यायालयीन आदेशानुसार, कायदेशीर कारवाई करण्यात येते; त्याचप्रमाणे, नियमबाह्य विद्युत रोषणाई करणाऱ्यांवर, प्रकाश-प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या पर्यावरणविरोधी व्यक्तींवर, प्रकाश-प्रदूषणाच्या निकषाखाली, कठोर-कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम आणि आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी आपल्या पत्रात शेवटी केली आहे.

# हॉटेल व्यावसायिकांना 'सेवा-शुल्क' आकारण्याची बंदी घालावी!

## 'धर्मराज्य पक्षा'ची ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : ठाणे शहरातील काही ठराविक हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समध्ये सीलबंद पाण्याची बाटली न देता, ग्राहकांकडून साध्या पिण्याच्या पाण्याचे १०० रुपये आकारले जात असून, एकूण बिलाच्या ५ टक्के ते २० टक्के एवढा सेवाशुल्क आकारला जात असल्याच्या तक्रारी, काही जागृत ठाणेकर नागरिकांच्या माध्यमातून 'धर्मराज्य पक्षा'कडे आलेल्या आहेत. यासंदर्भात हॉटेल किंवा रेस्टॉरंट व्यवस्थापनाकडून, ग्राहकांना कोणत्याही प्रकारची सूचना दिली जात नसल्याने, पक्षाच्या वतीने ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे एका लेखी पत्राद्वारे याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.**

**यासंदर्भात, 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, बेकायदेशीर सेवाशुल्कामुळे बिलामधील 'जीएसटी'सकट ग्राहकांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. विशेषतः खटकणारी बाब म्हणजे, ठाणे शहरातील काही ठराविक रेस्टॉरंट व्यवस्थापनांकडून, ग्राहकांची नावे आणि त्यांचे मोबाईल क्रमांक नोंद करुन घेतले जातात, ज्याची कोणतीही आवश्यकता तर नाहीच; उलटपक्षी; तसा कोणताही नियम प्रशासनाच्या वतीने लागू करण्यात आलेला नाही. अशाप्रकारे ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या संबधित हॉटेल्स किंवा रेस्टॉरंट्सची सखोल चौकशी करुन, त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी आणि ग्राहकहिताचे संरक्षण करावे. यामुळे, अशा अनैतिक व बेकायदेशीर बाबींवर वचक बसेल.** याबाबत, जिल्हा प्रशासनाकडून कठोर कारवाई झाल्यास, कुठलेही हॉटेल/रेस्टॉरंट व्यवस्थापन अशाप्रकारे ग्राहकांच्या फसवणुकीचे प्रकार करण्यास धजावणार नाही, असे नरेंद्र पंडित यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. याच पार्श्वभूमीवर, ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने याआधीच सेवाशुल्कांवर बंदी घातलेली आहे. यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्यावर, ग्राहक व्यवहार मंत्रालयाने, हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन तसेच, मुंबई ग्राहक पंचायतच्या प्रतिनिधींची बैठक बोलावून, ग्राहकांकडून वसूल होणाऱ्या सेवाशुल्कांवर बंदी घालण्यात येत असल्याचा निर्णय जाहीर केलेला असल्याचे, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, सदर पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. दरम्यान, एखादे हॉटेल किंवा रेस्टॉरंट ग्राहकांना सेवाशुल्काचा आग्रह करीत असेल तर, राष्ट्रीय ग्राहक मंचाकडे लेखी तक्रार करता येते; मात्र, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही माहिती, ग्राहकहित लक्षात घेऊन प्रसिद्ध केली गेलेली नसल्याने, त्याबद्दल ग्राहक नेहेमीच अनभिज्ञ असतात, ही अत्यंत दुर्दैवाची बाब होय.

ग्राहकांची अशापद्धतीने होणारी आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी, जिल्हा प्रशासनाच्या वतीने, ठाणे शहर/जिल्ह्यातील हॉटेल आणि रेस्टॉरंट चालक-मालक व व्यवस्थापनांना, त्यांच्या बिलात सरसकट 'सेवा-शुल्क' न आकारण्याच्या सूचना तत्काळ देण्यात याव्यात, त्याचबरोबर हॉटेल/रेस्टॉरंटमधील सेवा ही, निःशुल्क असल्याने, **ग्राहक संरक्षण प्राधिकरणाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना, हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये, ग्राहकांना स्पष्टपणे दिसतील अशाप्रकारे, ठळक अक्षरात आणि दर्शनी भागात, विशेषतः 'मराठी' भाषेतच लावण्याबाबतचे आदेश पारित करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी, 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे आपल्या पत्रातून केली आहे.**

# भारतात राजकारण अत्यंत Dangerous स्थितीला पोहोचलेले आहे

**हरियाणा राज्य निवडणुकांमध्ये झालेल्या मतदानापेक्षा मोजलेले मतदान जास्त असणे आणि ९० टक्क्यांच्या पेक्षा जास्त चार्ज असलेल्या EVM मध्येच भाजपला मतदान जास्त पडणे आणि ६० ते ७० टक्के चार्ज असणाऱ्या EVM मध्ये कांग्रेसला मतदान जास्त पडणे हे निश्चितच संदेहास्पद आहे ...**

अशाच प्रकारच्या घटना ज्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये घडल्या, त्याबद्दल निवडणूक आयोगाने कोणतीही दखल घेतल्याचे दिसलेले नाही किंवा त्याचे कोणतेही Logical स्पष्टीकरण दिलेले नाही...

जर निवडणुकांमध्ये जाणीवपूर्वक घोटाळा केला जात असेल EVM बदलल्या जात असतील; तर, इतक्या मोठ्या प्रमाणात घोटाळा करण्यासाठी अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा त्यात सहभाग निश्चित असणार... आणि अर्थात असा घोटाळा करण्यात सहभाग घेणारे प्रचंड Motivated असणाऱ्या व्यक्तीच असणार... सर्वसाधारण व्यक्ती अशा लोकशाहीविरुद्ध असणाऱ्या गुन्ह्यांच्या मध्ये भाग घेणे कठीण असते...

याच्याच बरोबरच काही अजून गोष्टींची नोंद घेतल्यास परिस्थितीची गंभीरता लक्षात यावी...

१. Electoral Bond Scheme बद्दल जी माहिती बाहेर आलीय, ती लक्षात घेता, त्यात भ्रष्टाचार झालेला असण्याची शक्यता स्पष्ट दिसते. त्याचप्रमाणे अदानी, Rafel, आणि नोटबंदीसारख्या अनेक प्रकरणात सरकारने कोणतीही चौकशी होऊ दिलेली नाही. ज्या चौकशा केल्या गेल्या त्यासुद्धा वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या आहेत

.....या प्रत्येक प्रकरणात तथ्य असल्यास, अनेक राजकारण्यांना आणि सरकारी अधिकाऱ्यांना खडी फोडण्यास जावे लागेल हे निश्चित...

२. भाजपी/ संघी What'sApp ग्रुपमध्ये आणि त्या संघटनांशी संबंधित व्यक्तींच्या मार्फत फिरविले जाणारे मेसेजेस पाहिले असता ''हिंदू-मुस्लिम'' संबंधित मुद्दे प्रचंड तापविले जात असल्याचे स्पष्ट दिसते...

३. अनेक विरोधी पक्ष नेते, ज्यांच्या विरुद्ध ED/ CBI/ IT कारवाई झाली; पण, ते भाजपमध्ये गेले नाहीत किंवा भाजप शी हात मिळवणी केली नाही, अशा बहुतेकांना कोर्टाच्या मार्फत दिलासा मिळालेला आहे आणि त्यांच्या विरुद्ध ED/ CBI/ IT कोणताही स्पष्ट पुरावा इतक्या काळानंतर सुद्धा सादर करू शकलेले नाही.

... हे नेते निर्दोष असून त्यांच्याविरुद्ध झालेली कारवाई राजकीय उद्देशाने झालेली होती हे स्पष्ट आहे

... असे नेते सत्तेत आल्यावर आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेणार नाहीत, ही शक्यता निश्चित कमी आहे...

**तर... माझे निष्कर्ष...**

१) भाजप-संघ यांना सत्ता सोडणे परवडणारे नसल्याने ते काहीही करून सत्ता हातात ठेवण्याचा प्रयत्न करतात आहेत...

२) हिंदू-मुस्लिम मुद्दे हे फक्त ''हाराकिरी'' करण्यास तयार असणारे, कर्मचारी/ अधिकारी/ सामान्य व्यक्ती हेरण्यासाठी वापरले जात आहेत..

.....त्यामुळे गेल्या दहा वर्षात हिंदू समाजासाठी जे काही करण्यात आले ते राजकिय सोयीचे असेच करण्यात आले, मूलभूत महत्वाचे असे काहीही करण्यात आलेले नाही...

३) कोणतेही सोंग आणता येते, पैशाचे सोंग आणता येत नसल्याने संघ आणि भाजपने कितीही प्रयत्न केला तरी, त्यांनी आणलेल्या धोरणांच्या मुळे यापुढे देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची शक्यता नसल्याने... यथावकाश त्यांना पायउतार व्हावे लागणार हे नक्की...

४) भाजप-संघ आणि त्यांचे पाठीराखे तसेच त्यांच्याशी संबंधित कर्मचारी/अधिकारी/सामान्य व्यक्ती यांना भोगाव्या लागणाऱ्या Backlashची तीव्रता ते कोणत्या परिस्थितीत आणि किती कारस्थाने करून झाल्यावर सत्ता सोडतात त्यावर ठरेल...

***...मिलिंद कोतवाल***

३० सप्टेंबर २०२४ ते आजपर्यंत एकनाथ शिंदे सरकारने २,४०० हून अधिक शासन निर्णय जारी केले आहेत. लाडकी बहिणीसाठी हजारो करोड रूपयांचा निधी उपलब्ध करू देणे, अदानीला मुंबईतील मिठागरे व इतर जमिनी देणे, जमिनींचे Reservation बदलणे, निधी उपलब्ध करून देणे, सार्वजनिक बांधकाम विभागाची करोडोंची कामे, मुंबईतील टोल माफ करून शासनाद्वारे ते पैसे, दिवाळखोरीत गेलेल्या कंत्राटदाराला एकरकमी देणे, पदोन्नती, स्थानांतरण व अधिकाऱ्यांच्या बदल्या वगैरे निर्णय या पंधरा दिवसात घेतले गेले आहेत.

सगळ्यांच्या डोळ्यादेखत हे अनधिकृत सरकार, दिवसाला साधारणतः १५० शासन निर्णय घेत आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रातून यावर काही एक प्रतिक्रिया नाही. सगळं शांत आहे. सुसंस्कृत पक्षाच्या दोन गुजराथी गुंडांनी, त्याच पक्षाच्या महाराष्ट्रातील सुसंस्कृत नेत्यांच्या तोंडात बोळा कोंबून, रिक्षावाल्या, टिनपाट ४० चाळीस चोराच्या टोळीला हाताशी धरून, मुंबई अदानीला विकली.

काही उखाडले नाही कुणी.

*महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी २४ लाख. एका व्यक्तीला दररोज २० ग्रॅम प्रमाणे महाराष्ट्रात दररोज २२ लाख ४८ हजार किलो तेलाचा खप होतो. सरकारने एका किलोवर २३ रुपयाची वाढ केली. म्हणजेच दररोज ५ कोटी १७ लाख ४ हजार रूपयांनी जनतेची लूट. महिन्याला १५५ कोटी ११ लाख २० हजाराची लूट. कोणासाठी लाडक्या बहिणीसाठी? म्हणजेच बहिणीचे घर लूटायचे आणि तिलाच त्याची भेंट द्यायची. शिल्लक आपण दाबायची. यांचा विचार लाडकी बहिण केव्हा करणार? बहिणीला गणित कोण शिकवणार ?*



**महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची लढाई फक्त बीजेपीशी नसून
तुमची लढाई आहे संघाशी,
निवडणूक आयोगाशी,
सर्वोच्च न्यायालयाशी,
अदाणी आणि अंबानीशी..**

**म्हणून महाराष्ट्रासाठी उभे राहा.
ही निवडणूक हातात घ्या,
बीजेपी चे षडयंत्र, लोकशाहीशी गद्दारी,
महाराष्ट्राशी द्रोह, गुजराथ्यांचे लांगूलचालन,
महाराष्ट्रातील कंपन्या गुजरातला पळवणारी टोळी,
तुमच्या मुलांच्या रोजगार पळवणारी करंटी टोळी विरुद्ध प्रचार करा.
याद राखा एकटा महाराष्ट्रच देश वाचवू शकतो.
महाराष्ट्रीय नागरिक होण्याचे कर्तव्य पार पाडा.
हे राज्य आपले आहे.**

**महाराष्ट्राचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.
महाराष्ट्र वाचविणे आपले कर्तव्य आहे.**

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**